रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
• वर्ष १६ • अंक १५३
www.ramprahar.com
बुधवार, २० डिसेंबर २०२३ • पाने ८ • किंमत ₹ २

अंतरंग
श्री शनैश्वर देवस्थानाच्या भ्रष्टाचाराची चौकशी होणार/२
मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील अनधिकृत टपऱ्यांवर हातोडा/५
श्री गणेशनगर संघ डब्ल्यूपीएलचा विजेता/८

## सरकारी शाळांमध्ये मुलींसाठी सॅनिटरी पॅडसह वेंडिंग मशीन



**मुंबई** : समग्र शिक्षा कार्यक्रमांतर्गत सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात राज्यातील सरकारी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नऊ हजार ९४० शाळांना सॅनिटरी पॅडसह वेंडिंग मशीन व इनसिनरेटर उपलब्ध करून देण्यात आले आले. त्यानंतर सन २०२३-२४मध्ये राज्यातील शाळांमध्ये आठ हजार २०३ शाळांना सॅनिटरी पॅडसह वेंडिंग मशीन पुरविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. पॅड उपलब्धता याबाबत सुधारणा करणे आवश्यक आहे. त्या शाळांना पुन्हा भेटी देऊन अहवाल सादर करण्याचे आदेश ११ ऑक्टोबर रोजी दिले आहेत. त्या पार्श्वभूमीवर राज्यातील सरकारी शाळांमध्ये मुलींसाठी आठ हजार २०३ सॅनिटरी पॅडसह वेंडिंग मशीन पुरविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याची माहिती शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी दिली.

# मराठा आरक्षणासाठी फेब्रुवारीत विशेष अधिवेशन

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची घोषणा

**नागपूर : प्रतिनिधी**

हिवाळी अधिवेशनादरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी (दि.१९) निवेदन सादर केले. या वेळी त्यांनी मराठा आरक्षणाबाबत सरकार सकारात्मक असल्याचे सांगून आरक्षणासाठी फेब्रुवारी महिन्यात विशेष अधिवेशन घेण्याची घोषणा केली.

ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे अशी सरकारची भूमिका आहे. ज्या त्रुटी आहेत त्या दूर करण्याचा प्रयत्न सरकार करीत आहे. मराठा समाजाला कायद्याच्या चौकटीत बसणारे आरक्षण देणार आहे. मागासवर्ग आयोगाचा अहवाल एक महिन्यात येईल. त्यानंतर फेब्रुवारीमध्ये विशेष अधिवेशन बोलावून आम्ही आरक्षण देऊ, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.



मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, कुणबी लिहिले आणि प्रमाणपत्र दिले एवढे सोपे काम नाही. कुणीही काळजी करण्याची गरज नाही. जे पात्र आहेत त्यांना सुलभपणे प्रमाणपत्र मिळेल. कुणबी पुरावे हे उर्दू, पारशी, मोडी लिपीमध्ये आहेत. त्यामुळे कागदपत्रांची सखोल तपासणी करूनच प्रमाणपत्र दिले जात आहेत.

राज्य मागासवर्ग आयोगाला नव्याने इम्पेरिकल डेटा गोळा करण्याचे आदेश दिलेले आहेत. सर्वेक्षणावर मराठा समाजाचे मागासलेपण सिद्ध होणार आहे. आयोग महिन्याभरात अहवाल सादर करणार आहे. त्याचे अवलोकन केल्यानंतर आरक्षण देण्याचा निर्णय घेतला जाईल. फेब्रुवारीमध्ये विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोलावून आवश्यकतेनुसार मराठा आरक्षण दिले जाईल. मराठा समाजाला टिकणारे आरक्षण देण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे. यातून इतर कुठल्याही समाजावर अन्याय होणार नाही याची खात्री सरकार घेत आहे, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी या वेळी दिले.

### *मागील सरकारच्या काळात त्रुटी राहिल्या*

*न्यायमूर्ती शिंदे यांच्या समितीने मराठवाड्यात चांगले काम केले आहे. २०१९मध्ये मराठा समाजास आरक्षण दिले होते, पण ते सुप्रीम कोर्टात टिकले नाही. मराठा समाजाचे मागासलेपण सिद्ध करण्यासाठीचे महत्त्वपूर्ण पुरावे अहवालामध्ये होते, मात्र ते मांडले गेले नाहीत. काही निवडक माहिती कोर्टाला सादर करण्यात आली होती. न्यायालयीन प्रक्रियेला जेवढे गांभीर्याने घ्यायला पाहिजे होते तेवढे घेतले नाही. त्याच्यात मला जायचे नाही. मागील सरकारच्या काळात ज्या त्रुटी राहिल्या होत्या त्या पूर्ण करण्यासाठी आमचे सरकार काम करीत आहे, असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी या वेळी सांगितले.*

रिलायन्स गॅस पाईपलाईन

# जानेवारीत होणार आमदार आणि अधिकाऱ्यांची बैठक




**नागपूर, पनवेल : रामप्रहर वृत्त**

रिलायन्स गॅस पाईपलाईन प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना न्याय मिळावा, अशी मागणी सर्वश्री आमदार प्रशांत ठाकूर, महेश बालदी, महेंद्र थोरवे, किसन कथोरे, भरत गोगावले यांनी मंगळवारी (दि.१९) सभागृहात केली होती. त्यावर योग्य ती कार्यवाही करण्यासाठी संबंधित अधिकारी व आमदार यांच्यासोबत जानेवारी महिन्यात बैठक घेणार असल्याचे आश्वासन राज्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी नागपूर येथे विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात दिले.

रिलायन्स गॅस पाईपलाईनसंदर्भात आमदार महेंद्र थोरवे यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. त्यावर उपप्रश्न मांडताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी मोबदल्यापासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांची बाजू सभागृहात मांडली, तर आमदार महेश बालदी यांनी प्रकल्पातील एजंट व अधिकाऱ्यांवर ताशेरे ओढले तसेच शेतकऱ्यांना जास्तीत जास्त भरपाई मिळावी, अशी मागणी केली.

यावर उत्तर देताना महसूलमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सांगितले, शेतकऱ्यांच्या ज्या जमिनी संपादित केल्या जातात त्यामध्ये शेतकरी उद्ध्वस्त होतात. त्यामुळे त्यांना योग्य मोबदला मिळाला पाहिजे अशा प्रकारची मागणी सन्माननीय सदस्यांनी केली आहे. **(पान २ वर..)**

### शेतकऱ्यांना लवकरात लवकर मोबदला द्या -आमदार प्रशांत ठाकूर



या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हटले की, कर्जत तालुक्यातून गेलेल्या रिलायन्स गॅस प्रकल्पातील बाधित एकाला ८० हजार, तर एजंटच्या ओळखीच्या शेतकऱ्याला पाच लाख रुपये अशी भरपाई देत दुजाभाव झाला आहे. काही शेतकऱ्यांना तर अद्याप कुठलाच मोबदला मिळाला नाही. त्यामुळे आत्मदहन आंदोलन, आमरण उपोषणे झाली, मात्र त्या वेळी शासनाच्या अधिकाऱ्यांनी तडजोड करून तात्पुरत्या स्वरूपात आंदोलने मिटवली. त्यामुळे पुन्हा येरे माझ्या मागल्या अशी परिस्थिती या ठिकाणी झाली. प्रकल्पबाधित झालेल्या शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला मिळावा यासाठी मी स्वतः शेतकऱ्यांच्या सोबत आंदोलने केली आहेत. अद्यापपर्यंत मोबदला न मिळालेल्या शेतकऱ्यांना त्यांचे पेमेंट लवकरात लवकर व्हावे, अशी माझी उपप्रश्नाद्वारे आग्रही मागणी आहे.

### शेतकऱ्यांचा विशेषत्वाने विचार करावा -आमदार महेश बालदी



आमदार महेश बालदी उपप्रश्नाच्या माध्यमातून म्हणाले की, बळीराजा मरता कामा नये. त्यासाठी रिलायन्सचे लाड करू नका. रिलायन्सचे एजंट आणि सरकारी अधिकारीहीसुद्धा यात सामील आहेत. शेतकऱ्यांची आयुष्यभराची कमाई फक्त त्यांचे शेत आहे. थोडीशी जागा आणि त्यातून पाईपलाईन गेल्यावर नुकसान होते. त्यामुळे याचा विशेषत्वाने विचार करून त्यांनाही इतर बाधितांप्रमाणे जास्तीत जास्त मोबदला मिळाला पाहिजे, अशी मागणीही आमदार महेश बालदी यांनी या वेळी केली.

# आता प्रत्येक ग्रामपंचायतीत पर्जन्यमापन यंत्र

**नागपूर : प्रतिनिधी**

राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये पर्जन्यमापन यंत्र बसवण्याचे नियोजन सुरू असल्याची घोषणा राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी केली. याद्वारे शेतकऱ्यांना पावसाची अचूक माहिती मिळेल, असे ते म्हणाले.

नमो किसान महासन्मान, पीकविमा, अवकाळीचे अनुदान यांसह विविध आकडेवारी कृषीमंत्री मुंडेंनी विधान परिषदेत मांडली. शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणाऱ्यांचे सरकार गेले. हे सरकार छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेली शिकवण आणि शेतकरी धोरणाला अनुसरून प्रामाणिक काम करणारे सरकार आहे. दोन्ही हातांनी शेतकऱ्यांना मदत करण्याची नियत असलेले आमचे सरकार असल्याचे कृषीमंत्री म्हणाले.

राज्यातील १६ हजार ग्रामपंचायतींमध्ये अद्ययावत पर्जन्यमापन यंत्र बसवण्याचे नियोजन शासन करीत असून पहिल्या टप्प्यात तीन हजारपेक्षा अधिक ग्रामपंचायतींमध्ये ही यंत्रे बसवण्यात येतील. याद्वारे शेतकऱ्यांना पावसाची अचूक माहिती मिळेल, पावसाचे मोजमाप व त्यामुळे झालेल्या नुकसानीची अचूक माहिती मिळेल. त्यानुसार निर्णय घेणे सोपे होईल, असे मंत्री मुंडे यांनी नमूद केले.


### ड्रोन मिशन राबवले जाणार

शेतकऱ्यांचे श्रम कमी करण्यासाठी राज्यात ड्रोन मिशन राबवणार असल्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी या वेळी जाहीर केले. शेतीत ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर करण्याची शक्यता तपासून ड्रोन मिशन राबविण्यात येणार आहे. याचाच एक भाग म्हणून कृषी विद्यापीठांमधून याबाबतचा स्वतंत्र डिप्लोमा कोर्स सुरू करण्यात आला आहे. याचा शेतकऱ्यांना नक्कीच लाभ होईल, असेही मंत्री मुंडे पुढे बोलताना म्हणाले.

# संसदेत गदारोळ करणाऱ्या खासदारांचे निलंबन सुरूच

## सुळे, थरूरांसह ४९ खासदार निलंबित





**नवी दिल्ली** : संसदेच्या सुरक्षेवरून सभागृहात गोंधळ घालणाऱ्या खासदारांचे निलंबन सुरूच आहे. लोकसभेत मंगळवारी (दि.१९) गोंधळ घालणाऱ्या आणखी ४९ विरोधी खासदारांना हिवाळी अधिवेशनातून निलंबित करण्यात आले आहे. त्यामुळे लोकसभा आणि राज्यसभा अशा दोन्ही सभागृहातून निलंबित करण्यात आलेल्या खासदारांची संख्या १४१ झाली आहे.

नव्याने निलंबित करण्यात आलेल्या खासदारांमध्ये काँग्रेस नेते शशी थरूर, मनिष तिवारी, कार्ती चिदंबरम, एम. डी फैजल, फारूक अब्दुल्ला, सुप्रिया सुळे, अमोल कोल्हे, दानिश अली, माला रॉय, डिम्पल यादव, सुशील कुमार रिंकू यांच्यासह ४९ जणांचा समावेश आहे. संसदीय कामकाज राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी खासदारांच्या निलंबनाचा प्रस्ताव मांडला. हा प्रस्ताव लोकसभा अध्यक्षांच्या खुर्चीवर बसलेले राजेंद्र अग्रवाल यांनी मंजूर केला.

## निवडक

### महाराष्ट्रामध्ये थंडीचा कडाका आणखी वाढणार

**पुणे** : महाराष्ट्रातील अनेक भागांत पुढील काही दिवस थंडीचा कडाका जाणवणार आहे. उत्तर भारतात थंडी सुरू झाली आहे. त्या भागांत बर्फवृष्टी होत आहे. यामुळे उत्तरेकडून थंड वारे वाहू लागले आहेत. त्याचा परिणाम महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशात होत आहे. मध्य प्रदेशाबरोबर जोरदार थंड वारे महाराष्ट्राच्या भू-भागावर ओढले जाण्याच्या शक्यतेमुळे कडाक्याच्या थंडीचा प्रभाव जाणवणार आहे.

### शिर्डीच्या साई मंदिर परिसरात ड्रोन उडवल्याने गुन्हा दाखल

**शिर्डी** : येथील प्रसिद्ध साईबाबा मंदिर परिसरात ड्रोनद्वारे शूट करून त्याचा व्हिडीओ रील मुंबई येथील एका तरुणाने इन्स्टाग्रामवर पोस्ट केला होता. या प्रकरणी त्या तरुणावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिर्डीच्या साई मंदिर परिसरात एक किमीपर्यंत ड्रोन उडवण्यावर बंदी आहे.

# रस्त्यांच्या प्रगतीचा आढावा आता पोर्टलवर

## मंत्री रवींद्र चव्हाण यांची सभागृहात माहिती

**नागपूर : प्रतिनिधी**

राज्यात सुरू असलेल्या रस्त्यांच्या कामांची प्रगती जाणून घेता यावी यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत लवकरच पोर्टल सुरू करण्यात येत असल्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी विधानसभेत सांगितले. जानेवारी महिन्यात हे पोर्टल सुरू होणार असून या माध्यमातून नागरिकांना पारदर्शकपणे कामांची प्रगती पाहता येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

रस्त्यांच्या कामाचा दर्जा चांगला राखण्याबाबत लक्षवेधी मांडण्यात आली असता मंत्री रवींद्र चव्हाण बोलत होते. राज्यात सार्वजनिक बांधकाम विभाग, ग्रामविकास विभाग, प्रधानमंत्री सडक योजना तसेच मुख्यमंत्री ग्राम सडक योजना अशा विविध योजनांच्या माध्यमातून रस्त्यांची कामे होत असतात. त्यांचे निकष आणि नियमदेखील त्यानुसार वेगवेगळे असतात. राज्यात प्रलंबित असलेल्या



विविध रस्त्यांच्या कामांना मागील दीड वर्षात निधी उपलब्ध करून ते विहित कालावधीत पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. जेथे अडचणी असतील त्या जाणून घेऊन कार्यवाही केली जात आहे. राज्यातील विविध भागात भौगोलिक परिस्थितीनुसार कामे करण्याचे तंत्रज्ञान वेगवेगळे असते. त्यानुसार केवळ काम देऊन न थांबता विभागामार्फत कामाच्या प्रत्येक टप्प्यावर देखरेख ठेवली जात आहे. पूर्ण झालेल्या रस्त्यांवर खड्डे पडले असतील अथवा कामात दिरंगाई होत असेल, देखभाल दुरुस्ती कालावधीमध्ये दुरूस्ती केली जात नसेल तर अशा कंत्राटदार आणि संबंधित अधिकाऱ्यांबरोबर बैठक घेऊन सूचना दिल्या जातील. त्यानंतरही दिरंगाई होत असल्यास संबंधितांवर कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

राज्यातील कामांच्या सद्यस्थितीबाबत माहिती देताना मंत्री चव्हाण म्हणाले की, सार्वजनिक बांधकाम विभागाची सुमारे ३०० कोटींची २०० कामे मंजूर असून त्यातील ८२ कामे पूर्ण, तर ३९ कामे प्रगतिपथावर आहेत. ७९ कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून १४७ कामे मंजूर असून ९५ कामे पूर्ण झाली आहेत. ४४ कामे प्रगतिपथावर, तर पाच कामे निविदास्तरावर आहेत. प्रधानमंत्री सडक योजनेची १२ कामे पूर्ण झाली असून मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत मंजूर २८ कामांपैकी २२ पूर्ण, तर सहा कामे प्रगतिपथावर आहेत.

# कोरियन तरुणीशी गैरवर्तनप्रकरणी एकाला बेड्या

**पुणे : प्रतिनिधी**

दक्षिण कोरियातील युट्यूबर तरुणीसोबत पुण्याच्या रस्त्यावर व्हिडीओ बनवत असताना घृणास्पद प्रकार घडला आहे. एका अज्ञात तरुणाने तिच्यासोबत गैरवर्तन केले आहे. त्याला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.

कोरियन तरुणीसोबत गैरवर्तन केल्याचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. तो व्हिडीओ पिंपरी चिंचवडमधील असल्याचे समोर आले. ही तरुणी मोबाईलवर व्हिडीओ रेकॉर्ड करीत असताना अचानक एक तरुण तेथे आला आणि त्याने फोटो काढण्याच्या बहाण्याने तिच्या खांद्यावर व गळ्यात हात टाकून गैरवर्तन केले. पोलिसांनी कारवाई करीत तरुणाला अटक केली आहे.

# राज्यातील बसस्थानकांचे दोन महिन्यांच्या आत होणार सुशोभीकरण

**नागपूर : प्रतिनिधी**

राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे २५१ बस आगार, ५७७ बसस्थानके आहेत. महामंडळाकडे भाडेतत्त्वावर ४६७ बस असून महामंडळाच्या स्वमालकीच्या १५ हजार ७९५ बसेस आहेत. या बसेसमधून दररोज ५४ लाख प्रवासी प्रवास करीत असतात. एवढे मोठे जाळे असलेल्या महामंडळाच्या बसस्थानकांचे दोन महिन्यांच्या आत सुशोभीकरण व पायाभूत सुविधांचा विकास करून रूपडे पालटविण्यात येणार असल्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री (सार्वजनिक उपक्रम) दादाजी भुसे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

राज्यातील बसस्थानकांच्या दुरुस्तीबाबत सभागृहात प्रश्न उपस्थित झाला होता. या प्रश्नाच्या चर्चेदरम्यान सदस्यांनी उपप्रश्न उपस्थित केले. त्यावर मंत्री भुसे म्हणाले, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियानांतर्गत राज्यातील या १९३ बसस्थानकांचे सौंदर्यीकरण व सुशोभीकरण होणार आहे तसेच बसस्थानकाच्या आवारात काँक्रीटीकरण करण्यात येणार आहे. यासाठी एमआयडीसी आणि एसटी महामंडळ यांच्यात ६०० कोटी रुपयांचा सामंजस्य करार करण्यात आला. राज्यात १८६ बसस्थानकांचा बीओटी तत्त्वावर विकास करण्यात येणार आहे. आतापर्यंत ११ निविदा काढण्यात आल्या असून दोन कामांना विकसकांचा प्रतिसाद मिळाला आहे तसेच ४० निविदा लवकरच काढण्यात येणार आहे. बीओटी तत्त्वावरील कामांना प्रतिसाद कमी आहे. याबाबत निवृत्त सनदी अधिकारी सुबोध कुमार यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. समितीचा महिनाभरात अहवाल येईल व त्यानंतर या पद्धतीतील त्रुटी दूर करण्यात येऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल.

राज्यात ४५ बसस्थानकांचे काम बीओटी तत्त्वावर पूर्ण करण्यात आले तसेच ७२ बसस्थानकांचा विभागाच्या निधीतून विकास करण्यात येत आहे. यामध्ये ७० कामे प्रगतिपथावर आहेत. या वर्षात या कामांसाठी ४०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यामधून ९७ बसस्थानकांचे नूतनीकरण करण्यात येणार आहे. लोकसहभाग, आपलं गाव-आपलं बसस्थानक या संकल्पनांतूनही बसस्थानके सुशोभित करण्यात येत आहे. कोल्हापुरातील बसस्थानकांच्या कामांची तांत्रिक तपासणी करण्यात येऊन यामध्ये दोषी आढळलेल्यांवर कारवाई करण्यात येईल, असे मंत्री भुसे यांनी स्पष्ट केले.

### स्वच्छ, सुंदर बसस्थानके अभियान

*राज्यातील १९३ बसस्थानकांचे सौंदर्यीकरण व सुशोभीकरण करण्यासाठी सोमवारीच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत एमआयडीसी आणि एसटी महामंडळ यांच्यात ६०० कोटी रुपयांचा सामंजस्य करार करण्यात आला. एसटी बसस्थानकांचा कायापालट करण्यात एमआयडीसीने योगदान देण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले होते. या आवाहनाला प्रतिसाद म्हणून हा सामंजस्य करार करण्यात आला. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ, सुंदर बसस्थानक अभियानांतर्गत हे सुशोभीकरण करण्यात येणार आहे.*

# मिचेल स्टार्क ठरला सर्वांत महागडा खेळाडू

## आयपीएल लिलावात 'केकेआर'कडून २४.७५ कोटींची बोली

**दुबई : वृत्तसंस्था**

दुबईमध्ये मंगळवारी (दि.१९) सुरू झालेल्या आयपीएल लिलावात ऑस्ट्रेलियाचा कर्णधार पॅट कमिन्सला सनरायझर्स हैदराबादने २०.५० कोटी रुपयाला खरेदी केले आणि कमिन्स हा आयपीएल इतिहासातील सर्वाधिक बोली लागलेला खेळाडू ठरला होता, मात्र हा इतिहास अवघ्या तासाभरात मोडला. ऑस्ट्रेलियाच्याच मिचेल स्टार्कला कोलकाता नाईट रायडर्सने तब्बल २४.७५ कोटींच्या रकमेत आपल्या संघात दाखल करून घेतले आहे.

गेल्या लिलावात इंग्लंडचा सॅम करन हा सर्वांत महागडा खेळाडू होता, त्याला १८.५० कोटी रुपये मिळाले होते, पण या लिलावात सर्वांत महागडा खेळाडू पहिल्यांदा पॅट कमिन्स ठरला होता. त्यानंतर काही वेळातच आयपीएलमधील सर्वांत महागडा खेळाडू स्टार्कच्या रूपात पहायला मिळाला.


न्यूझीलंडचा खेळाडू डेरेल मिशेलला



चेन्नई सुपर किंग्जने १४ कोटींना विकत घेतले. हा यंदाचा तिसरा महागडा खेळाडू ठरला. मिशेलची लिलावासाठी मूळ किंमत एक कोटी रुपये होती.

**आयपीएल लिलावात कोटीच्या कोटी उड्डाणे/८**

### हर्षल पटेल झाला मालामाल



भारताचा वेगवान गोलंदाज हर्षल पटेलला पंजाब किंग्सने ११.७५ कोटी रुपयांना खरेदी केले. गुजरात टायटन्स आणि पंजाबमध्ये हर्षलला दोन कोटी रुपयांची मूळ किंमत घेऊन खरेदी करण्याची स्पर्धा होती. अखेर पंजाबने हर्षलसाठी मोठी किंमत मोजली.

### समीर रिझवीला मोठी किंमत



आयपीएलच्या लिलावात महेंद्रसिंह धोनीच्या चेन्नई सुपर किंग्सने एक स्मार्ट खेळी खेळल्याचे पहायला मिळाले. चेन्नईच्या संघाने या वेळी युवा समीर रिझवीला तब्बल आठ कोटी ४० लाख रुपये मोजत आपल्या ताफ्यात स्थान दिले. त्यानंतर रिझवीच्या नावाची जोरदार चर्चा सुरू झाली.

# छत्रपतींच्या जयघोषाने प्रतापगड दुमदुमला!

## शिवप्रताप दिन उत्साहात साजरा

**वाई : प्रतिनिधी**

जय भवानी जय शिवाजी, छत्रपती शिवाजी महाराज की जय असा जयघोष करीत मंगळवारी (दि.१९) प्रतापगडावर शिवप्रताप दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी शिवरायांच्या पुतळ्यावर हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या अनेक घटनांच्या साक्षीदार असणारा प्रतापगड मंगळवारी शिवमय झाला होता. प्रतापगडावर शिवरायांनी अफझल खानास संपवून शौर्य गाजवले होते. यामुळे या दिवसाला महत्त्व आहे. सातारा जिल्हा प्रशासनाच्या वतीने शिवप्रताप दिन साजरा करण्यात आला.

सकाळी किल्ले प्रतापगडवरील भवानी मातेची पूजा झाल्यानंतर शिवप्रताप दिन सोहळ्यास



प्रारंभ झाला. यानंतर मानाच्या पालखीची मान्यवरांच्या हस्ते पूजा करण्यात आली. या वेळी भगव्या ध्वजाचे स्थानिक ग्रामस्थ आणि प्रशासनाच्या वतीने ध्वजवंदन करण्यात आले. छत्रपतींची शिवमूर्ती असलेल्या या पालखीची वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली. या वेळी शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पनवेलमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य

## शाळा, महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रम व कार्यशाळा

### सीकेटी महाविद्यालयात आपत्ती व्यवस्थापन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स (स्वायत्त) महाविद्यालयातील नॅशनल कॅडेटस् कौर (एनसीसी) विभाग व श्री सत्य साई सेवा संस्था यांच्या संयुक्त विद्यमानाने आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा रविवारी (दि. १७) आयोजित करण्यात आली होती.

श्री सत्य साई सेवा संस्थेचे प्रदेशाध्यक्ष श्रीनिवास व जिल्हाध्यक्ष श्री. विजय हे या कार्यशाळेत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच या कार्यशाळेमध्ये, ३० एस. डी. कॅडेट्स व ४५ एस. डब्ल्यू. कॅडेट्स असे एकूण ७५ कॅडेट्स सहभागी झाले होते. श्री सत्य साई सेवा संघटनेच्या प्रशिक्षकांच्या नेतृत्वाखालील सैद्धांतिक सत्रांमध्ये (Theoretical Sessions), एनसीसी कॅडेट्स, दोरी, गाठी आणि त्यांचे प्रकार, प्रथमोपचार, आपत्कालीन बचाव कार्य, आपत्ती आणि त्यांचे प्रकार आणि आग यासारख्या विषयांवर व्याख्यानासाठी उपस्थित होते. प्रशिक्षकांसोबत थिअरी सत्रानंतर, एन.सी.सी कॅडेट सीपीआर कसे प्रशासित करावे यावरील प्रात्यक्षिकामध्ये सहभागी झाले. खुल्या आणि बंद अशा दोन्ही ठिकाणी, ठिणगी असल्यास, आग विझवण्यासाठी अग्निशामक यंत्राचा वापर कसा करायचा हेदेखील त्यांना शिकण्यास मिळाले. लेफ्टनंट नीलिमा तिदार यांनी कार्यशाळेचे प्रास्थाविक तथा श्री सत्य साई सेवा संस्थेचे आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यसाठी लेफ्टनंट नीलिमा तिदार आणि डॉ. जितेंद्र पावरा यांनी कठीण परिश्रम घेतले.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर आणि सचिव डॉ. एस. टी. गडदे, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी नॅशनल कॅडेटस् कौर (एनसीसी) विभागाचे प्रमुख प्रो. डॉ. उद्धव भंडारे, लेफ्टनंट नीलिमा तिदार आणि एन.सी.सी कॅडेट्स यांचे कौतुक केले.

### ‘सीकेटी’च्या विद्यार्थ्यांनी अनुभवल्या क्षेत्रभेटी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालय मराठी प्राथमिक विभागाच्या वतीने पहिली, दुसरीच्या विद्यार्थ्यांची सिडको उद्यानात व तिसरीच्या विद्यार्थ्यांची पोस्ट ऑफिस तसेच चौथीच्या विद्यार्थ्यांची अभ्युदय बँक नवीन पनवेल येथे क्षेत्रभेट देण्यात आली.

पहिली/दुसरीच्या विद्यार्थांनी सिडको उद्यानात खेळण्याचा आनंद घेतला व त्या ठिकाणी असणाऱ्या वेगवेगळ्या वस्तूंचा काळजीपूर्वक वापर कसा करावा या बाबत शिक्षकांनी मुलांना मार्गदर्शन केले. तिसरीच्या विद्यार्थ्यांना पोस्ट ऑफीसचे व्यवहार कसे चालतात? तार, पार्सल, पत्रे, तिकिटे, मनीऑर्डर म्हणजे काय? त्याच प्रमाणे टपाल या विषयी तेथील वरिष्ठ पोस्टमास्तर यांनी सविस्तर माहिती दिली. चौथीच्या विद्यार्थांना



बँकेचे व्यवहार कसे चालतात? बँक कोणकोणत्या प्रकारची कर्ज देते? नवीन खाते उघडायचे असल्यास कोणकोणती कागदपत्रे लागतात? अशा प्रकारची माहिती अभिजित काटे यांनी दिली.

या वेळी मुख्याध्यापक मानकर, सहल प्रमुख मोटे मॅडम, पहिली, दुसरी, तिसरी व चौथीचे वर्गशिक्षक तसेच शाळेचे शिपाई उपस्थित होते.


## पोदी शाळेत कोलाज काम, टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ वस्तू स्पर्धा

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिकेच्या दहा शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या संपुर्ण विकासाच्या दृष्टीने सातत्याने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येत असते. महापालिकेच्या शाळा क्रमांक ०८ पोदी येथे ‘कोलाज काम व टाकाऊ वस्तुंपासून टिकाऊ वस्तू तयार करणे ’स्पर्धा मंगळवारी (दि. १९) आयोजित करण्यात आली होती. या आंतरशालेय स्पर्धेत महापालिकेच्या दहा शाळा सहभागी झाल्या होत्या.

आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा तीन गटात घेण्यात आली. पहिला गटात इयत्ता दुसरी व तिसरी, दुसऱ्या गटात चौथी व पाचवी आणि तिसऱ्या गटात सहावी व सातवीचा समावेश होता. पहिल्या व दुसऱ्या गटांना कोलाज काम हा विषय होता, तर तिसऱ्या गटाला टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ वस्तू तयार करणे





हा विषय होता. यामध्ये विद्यार्थ्यांनी शाळेतील खराब झालेल्या वस्तूंपासून वेगवेगळ्या प्रकारचे साहित्य तयार केले. यामध्ये कागद, करवंट्या, तुटलेले पेन, तुटलेल्या वस्तू, रद्दीपेपर, खराब बॅगा यांना साफ करून विविध वस्तू तयार केल्या. आपल्या कल्पनाशक्तीचा वापर करून विद्यार्थ्यांनी विविध वस्तू बनविल्या होत्या. महापालिकेच्या सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेमध्ये सहभाग घेतला होता.

या स्पर्धेसाठी प्रत्येक शाळेतून दोन शिक्षक उपस्थित होते. ही स्पर्धा अतिरीक्त आयुक्त भारत राठोड, सहाय्यक आयुक्त सुवर्णा दखणे, शिक्षण विभागाच्या प्रशासन अधिकारी कीर्ती महाजन तसेच पोदी शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापिका अश्विनी भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली.

**विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती**

कचऱ्याचे वाढते प्रमाण आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या रोखण्यासाठी शालेयस्तरावरती विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्याच्या हेतूने ही स्पर्धा घेण्यात आली. शाळेमध्ये, घरांमध्ये निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण कमी करण्यासाठी टाकाऊतून टिकाऊ हा पर्याय अधिक कल्पक व कचरा मुक्तीच्या दिशेने टाकलेले एक पाऊल असू शकते. त्यामुळे कचऱ्यात जाणाऱ्या अनेक वस्तूंचा पुनर्वापर होऊ शकतो हे या विद्यार्थ्यांना समजले.

## विसपुते महाविद्यालयात वक्तृत्वकला, संवादकौशल्य कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र लोककल्याणकारी सेवा संस्थेच्या विशेष सहकार्याने डी. डी. विसपुते डी.एड. कॉलेज व अमरदीप बालविकास फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने विचुंबे येथील डी.डी. विसपूते विद्यासंकुलात वक्तृत्वकला, संवादकौशल्य कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या वेळी आसमंत व्हाईस अकॅडमीच्या संचालिका व आकाशवाणी निवेदिका तथा व्हाईसक्रीन पौर्णिमा शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



वक्तृत्व हे व्यक्तिमत्व घडविण्याचे विलोभनीय माध्यम आहे. श्रोत्यांच्या शैक्षणिक व सामाजिक दर्जा नुसार व वयाप्रमाणे कुशल वक्त्याला आपली भाषा वापरून श्रोत्यांची नस पकडता आली पाहिजे, अशी माहिती पौर्णिमा शिंदे यांनी दिली.

भाषणाच्या प्रात्यक्षिकांमध्ये मोहिनी जाधव, चैताली पाटील, वर्षा गोडसे व अस्मिता चौधरी यांनी समरसून भाग घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाराष्ट्र लोक कल्याणकारी सेवा संस्थेचे सर्वेसर्वा व या कार्यशाळेची संकल्पना साकारणारे एन.डी. खान यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंकज पाटील यांनी केले. वक्त्यांचा परिचय कुसुम मधाळे यांनी मधाळ शब्दात करून दिला. कार्यक्रमाला आदर्श ट्रेनिंग टीचर्स स्कूलच्या प्राचार्य जाई जगताप, छाया अक्कलकोटे, सरिता कदम इत्यादी मान्यवर उपस्थित होते. मनीषा म्हात्रे यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे छायाचित्रण केले.

मयुर याने ध्वनी संयोजनाची जबाबदारी लीलया झाली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सलमा खान, मीना ताकमोगे, राजकुमार ताकमोगे व रमेश चव्हाण यांनी विशेष परिश्रम घेतले. पंकज पाटील यांनी आभार मानले. या कार्यशाळेत मोठ्या प्रमाणात डी.एड., नर्सिंग व आदर्श ट्रेनिंग स्कूलचे विद्यार्थी उपस्थित होते.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात भारतीय संस्कृती ज्ञान परीक्षा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात मंगळवारी (दि. १९) सकाळी ११ वाजता भारतीय संस्कृती ज्ञान परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेची आयोजन रसायनशास्त्र विभाग व व जागतिक ज्ञान परिवार व देव संस्कृती विश्वविद्यालय हरिद्वार यांच्या यांच्या संयुक्त विद्यमाने ही परीक्षा घेण्यात आली.

या ज्ञान परीक्षेसाठी ज्ञान परिवाराचे श्री. कौल व आर. पी. विश्वकर्मा हे उपस्थित होते. या परीक्षा देण्यासाठी वेगवेगळ्या महाविद्यालयातून सुमारे २१



विद्यार्थी व विद्यार्थ्यांनीनी उपस्थिती दर्शवली. या परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृतीचे असणारे ज्ञान लेखनाच्या माध्यमातून सादर करण्याची संधी मिळाली.

प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. या ज्ञान परीक्षेचे आयोजन रसायनशास्त्र विभाग प्रमुख प्रा. महेश्वरी झिरपे यांनी केले तसेच प्रा. डॉ. नीलम लोहकरे, प्रा. रूपाली नागरेकर, प्रा. डॉ. दीपिका हसीजा यांनी सहकार्य केले.



(छाया : योगेश पाटील)

**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. त्याबद्दल तुकाराम हरी वाजेकर विद्यालय फुंडे येथील चेअरमन कृष्णाजी कडू, प्राचार्य एम.जी. म्हात्रे, महेश पाटील, रायगड विभागीय अधिकारी आर.पी. ठाकूर, रयत शिक्षण संस्थेचे रायगड विभाग ऑफिस प्रमुख गुजर, पीआरओ बाळासाहेब कारंडे यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे अभिनंदन केले.**



**पनवेल : रयत शिक्षण संस्थेचे पीआरओ बाळासाहेब कारंडे यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी ‘रयत’चे रायगड विभागीय अधिकारी आर.पी. ठाकूर, स्टेट बोर्ड प्रिन्सिपल स्वप्नाली म्हात्रे, सीबीएससी बोर्डचे प्रिन्सिपल अविनाश कुलकर्णी, ‘रयत’चे रायगड विभाग ऑफिस प्रमुख गुजर, मार्केट यार्ड स्कूल सहशिक्षक एम.आर. पाटील आदी उपस्थित होते.**

## भेंडखळमधील बीपीसीएल कंपनीवर जप्तीची कारवाई



**उरण : प्रतिनिधी**

वारंवार नोटीसा बजावल्यानंतरही मालमत्ता कराची थकबाकी भरण्यास दुर्लक्ष करणाऱ्या बोकडवीरा-उरण येथील भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन (बीपीसीएल) वर थकीत असलेल्या नऊ कोटी दोन लाख ७१ हजार ७२२ रुपयांच्या वसुलीसाठी भेंडखळ ग्रामपंचायतीने सोमवारी (दि. १८) जप्तीची कारवाई केली.

उरण तालुक्यातील भेंडखळ ग्रामपंचायत हद्दीत भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन प्रा. लि. प्रकल्प उभारण्यात आला आहे. ग्रामपंचायतीच्या हद्दीत उभारण्यात आलेल्या या कंपनीने भेंडखळ ग्रामपंचायतीची २०१६ पासून मालमत्ता कराची मागील सात वर्षांची एकूण नऊ कोटी दोन लाख ७१ हजार ७२२ रुपये थकबाकी आहे. थकबाकीच्या रकमेचा भरणा मुदतीत करण्यासाठी ग्रामपंचायतींने कंपनीला वारंवार नोटीसाही बजावल्या आहेत. त्याचबरोबर ७ नोव्हेंबर २०२३ रोजी थकबाकी भरण्यासाठी निर्वाणीचा इशारा देताना ३० दिवसांत भरणा न केल्यास कंपनीच्या मालमत्ता जप्त करण्याची नोटीसही बजावली होती.

भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन प्रा.लि. ग्रामपंचायतीने बजावलेल्या नोटिसीला दाद देत नसल्याने अखेर ग्राम विस्तार अधिकारी विनोद मिंडे, सरपंच मंजिता पाटील, उपसरपंच दीपक ठाकूर, सदस्य अजित ठाकूर, अभिजित ठाकूर, अक्षता ठाकूर, संगीता भगत, शितल ठाकूर, लिलेश्वर भगत, स्वाती ठाकूर, स्वाती घरत, प्राची पाटील, सोनाली ठाकूर आणि ग्रामविकास अधिकारी किरण केणी यांच्या नेतृत्वाखाली भेंडखळ ग्रामपंचायतीने जप्तीची कारवाई केली आहे.

टर्मिनल व्यवस्थापक सोमन मुर्मू यांनी वरिष्ठांशी चर्चा करून मालमत्ता कराच्या थकबाकीची रक्कम एका महिन्याच्या मुदतीत भरण्याची लेखी पत्राद्वारे हमी दिली आहे.

## दत्त जयंतीनिमित्त शिवाजीनगरमध्ये तीन दिवस अखंड हरिनाम सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री समर्थ सद्गुरू बाळकृष्ण महाराज यांच्या आशीर्वादाने व स्व. चांगू काना ठाकूर आणि स्व. भागुबाई चांगू ठाकूर यांच्या प्रेरणेने शिवाजीनगर येथील बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदिरात मार्गशीर्ष शुद्ध ते दत्त जयंतीपर्यंत मार्गशीर्ष शुद्धपोर्णिमा अखंड हरिनाम सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. २४ ते २६ डिसेंबरपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहेत.

बाळासाहेब महाराज नंदेश्वर यांच्या हस्ते बाळकृष्ण महाराज यांच्या गुरू चरित्रामृत ग्रंथाचे श्री दासबोथ एकनाथ भागवत पारायण पर्वणीचा प्रारंभ रविवारी (दि. २४) होणार आहे. मंगळवारी (दि. २६) दत्त जयंतीनिमित्त माऊलींवर पुष्पवृष्टी होणार आहे. तीन दिवस होणाऱ्या भजन, प्रवचन, कीर्तन या कार्यक्रमांना उपस्थित राहण्याचे आवाहन कार्यक्रमाचे संयोजक माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व शिवाजीनगर ग्रामस्थ मंडळ यांनी केले आहे. कार्यक्रमाचे व्यवस्थापक शिवाजी नगर-गव्हाण खारकोपर-न्हावे-न्हावेखाडी संचलित देवसागर साधक समाज (इंचगिरी सांप्रदाय) हे आहेत. तीन दिवस होणाऱ्या धार्मिक कार्यक्रमांमध्ये रोज सकाळी काकड आरती, श्रींची नित्यपूजा, ग्रंथवाचन व ध्यान, भजन, प्रवचन, दुपारी आरती, सायंकाळी ग्रंथ वाचन व ध्यान, आरती, रात्री ग्रंथ वाचन व ध्यान, भजन व कीर्तन होईल.

## गळ्यातील सोनसाखळी खेचून दोघ पसार

**पनवेल :** एका ७७ वर्षीय वृद्ध महिलेच्या गळ्यातील सोनसाखळी खेचून दोघेजण मोटारसायकलीवरून पसार झाल्याची घटना खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे.

येथील डीमार्ट समोरील रस्त्यावरून ७७ वर्षीय वृद्ध महिला इतर महिलेसोबत पायी जात होती. याचवेळी मोटरसायकलीवरून आलेल्या दोघा अज्ञात व्यक्तींनी त्यांच्या गळ्यातील एक लाख पंधरा हजार रुपयाची सोनसाखळी खेचली व ते तेथून पसार झाले.

पाहिजेत

संपर्क सल्लागार / अधिकारी

आम्ही मुंबई मधील प्रसिद्ध विकासक आहोत आणि मुंबई व नवी मुंबई मध्ये मोठे प्रकल्प निर्माण करत आहोत

आम्हाला अशा उमेदवाराची गरज आहे जे सिडको/ नैना/ महसुल विभाग या आस्थापना मधुन निवृत्त झाले आहे आणि जे आम्हाला नैना/ महसुल विभाग कडून जरूर असलेली महत्त्वाची माहिती व मंजुरी मिळवण्यात सहकार्य करतील.

तरी पात्र उमेदवारांनी आपला cv: hr@mapletreeproperty.com या email वर पाठवा

मॅपलेट्री प्रॉपर्टी प्रा. लि.

तिसरा मजला, सुनामा हाऊस, १४० ऑगस्ट क्रांती मार्ग, शालिमार हॉटेल समोर, केम्प्स कॉर्नर, ग्रँट रोड (पश्चिम), मुंबई-४०००२६. फोन: २३८३५५५५/ ७५०६५०६०९३

## संपादकीय

# धारावीचा बचाव विकासातच

धारावीला आजतागायत 'एसआरए'पासून वंचित का ठेवले गेले? उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले तरीही त्यांनी धारावीकरांना घर दिले नाही. आता ४०० स्क्वेअर फुटाचे घर अदानी समूह बांधून देत आहे तर त्यावरून राजकारण कशासाठी? मातोश्री-३ बांधल्यानंतरच धारावीचा विकास करणार का, या धारावीकरांच्या प्रश्नाला उद्धव ठाकरे काय उत्तर देणार आहेत?

**धारावी विकास प्रकल्पाच्या मुद्यावरून अदानी कंपनी आणि सत्ताधाऱ्यांच्या विरोधात उद्धव ठाकरे यांच्या गटाने अलीकडेच मोर्चा काढला. उद्धव ठाकरे सर्व विकास प्रकल्पांना आधी विरोध करतात. नंतर चर्चा करून सेटलमेंट करतात, हीच त्यांची पद्धत आहे अशी टीका होतच होती, पण ठाकरे गटाच्या या मोर्च्याबद्दल सत्ताधाऱ्यांनीच नव्हे तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनीही प्रश्न उपस्थित केला. 'सेटलमेंट नीट होत नाही' म्हणून हा मोर्चा ठाकरे गटाने काढल्याची टीका राज ठाकरे यांनीही केली. उद्धव ठाकरे यांच्या मोर्चाला उत्तर म्हणून भारतीय जनता पक्ष, शिवसेना आणि महायुतीतील इतर पक्ष मिळून आता ठाकरे यांचे निवासस्थान असलेल्या 'मातोश्री'वर मोर्चा काढणार आहेत. धारावी टी जंक्शन ते मातोश्री असा मोर्चा भाजप व मित्रपक्षांकडून काढला जाईल. एकूणात आशिया खंडातील सर्वाधिक मोठी झोपडपट्टी असा लौकिक मिरवणारी 'धारावी' सध्या पुनर्विकासाच्या मुद्द्यावरून राजकीय संघर्षाच्या केंद्रस्थानी आली आहे. काळाच्या ओघात मुंबई महानगरीतील कापडगिरण्या इतिहासजमा झाल्या. पाठोपाठ गिरणगावातील अनेक चाळी तसेच मिल कंपाऊंडच्या जागी अफाट उंचीच्या इमारती उभ्या राहिल्या वा राहताना दिसत आहेत. या पुनर्विकासाने मध्य व दक्षिण मुंबईचे रूप पालटू लागले आहे. जागतिक कीर्तीचे शहर असलेली मुंबापुरी आता लवकरच दुबई-सिंगापूरसारखी दिसू लागेल अशी चिन्हे आहेत. शहरभरात उभे राहणारे मेट्रोचे जाळे ही त्याच दिशेने चाललेली वाटचाल आहे. एकीकडे शहर झपाट्याने आपले रूपडे बदलत असताना या महानगराच्या मध्यभागी असलेली धारावी ही झोपडपट्टी मात्र गेली अनेक वर्षे आपल्या विकासाच्या निव्वळ चर्चाच ऐकते आहे. गेली पंधरा-वीस वर्षे म्हणजे जवळपास एक पिढी लहानाची मोठी झाली तरी धारावीचा विकास चर्चेच्या पुढे गेलेला नाही. चित्रपट व माहितीपटांतून जगभरात नाव कमावलेल्या धारावीच्या विकासात अनेक आंतरराष्ट्रीय कंपन्यांनी रस घेतला व जागतिक निविदांना प्रतिसादही दिला, परंतु विकास कसा होणार, निविदेच्या अटीशर्ती अशा अनेक टप्प्यांवर अडखळत धारावीचा विकास कागदावरच राहिला आहे. कुठलाही प्रकल्प रखडला की त्याचा खर्च वेगाने वाढत राहतो. धारावी विकास प्रकल्पाचेही तेच होते आहे. आणखी एका मुद्यावर धारावीचा विकास रखडतो आहे. धारावी हा काही निव्वळ एक गृहप्रकल्प नाही. धारावीची अफाट वाढ हीच मुळात तिथे चालणाऱ्या नानाविध उद्योगांतून झाली आहे. प्रचंड मोठ्या अशा चामड्याच्या उद्योगाचे ते केंद्र आहे. मातीची भांडी, तयार कपडे व इतर अनेक उद्योगांना पूरक ठरणाऱ्या गोष्टींचे उत्पादन तिथे घराघरातून केले जाते. या साऱ्या उद्योगांना सामावून घेऊनच धारावीचा विकास करावा लागणार आहे. निविदांवरून चाललेली कोर्टकज्जेगिरी, 'धारावी बचाव'चे नारे या साऱ्याला आता धारावीकर कंटाळले आहेत. शहरात अवतीभवती सगळीकडे विकास सुरू असताना धारावीनेच वादाच्या भोवऱ्यात किती दिवस गटांगळ्या खायच्या हा धारावीकरांचा प्रश्न रास्त आहे.**

# भटक्या कुत्र्यांना खायला देणे धोकादायक!





**खबरबात**
**नितीन देशमुख**

वाघबकरी या प्रसिद्ध चहाचे मालक पराग देसाई यांचा रस्त्यावरील कुत्र्यांच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याचे वृत्त वेगवेगळ्या वृत्तसंस्थांनी दिले आणि पुन्हा एकदा भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्याचा प्रश्न चर्चेला आला. रात्री-अपरात्री रस्त्याने जाणाऱ्या नागरिकांवर भटक्या कुत्र्यांकडून हल्ला करण्याच्या अनेक घटना पनवेल महापालिका परिसरात ही घडतात. या हल्ल्यात गंभीररित्या जखमी होऊन अनेकांना रेबिजमुळे आपले प्राण गमवावे लागल्याच्या घटनादेखील समोर आल्या आहेत, पण आता याची गंभीर दखल सर्वोच्च न्यायालयाने घेतली असून भटक्या कुत्र्यांनी नागरिकांवर हल्ला केला तर कुत्र्यांना खायला घालणारे लोक जबाबदार असतील, अशी टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाने केली आहे.

एका आकडेवारीनुसार भारतात सहा कोटींहून जास्त भटके कुत्रे आहेत. भारतात दरवर्षी सुमारे दोन कोटी लोकांना प्राणी चावतात. यातल्या ९२ टक्के घटना तर कुत्र्यांनी चावा घेण्याच्या आहेत. दिल्ली, बंगळुरू, मेरठ, गुरुग्राम, पंजाब, नोएडा, मुंबई, पुणे, बिजनौर अशा अनेक शहरांमधून भटक्या कुत्र्यांनी हल्ला केल्याच्या बातम्या येत आहेत.

वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन (डब्ल्यूएचओ) नुसार, जगात रेबीजने मृत्युमुखी पडणाऱ्यांपैकी ३६ टक्के मृत्यू हे भारतात होतात. म्हणजेच दरवर्षी १८,००० ते २०,००० लोक रेबीजमुळे मरतात. भारतात रेबीजमुळे होणाऱ्या मृत्यूंपैकी ३० ते ६० टक्के मृत्यू हे १५ वर्षांखालील मुलांचे असतात.

भारतात २००१ मधील एका कायद्यानुसार कुत्र्यांना ठार मारण्यास बंदी घालण्यात आली आणि यामुळे देशात भटक्या कुत्र्यांच्या संख्येत वाढ झाली. तसे बघायला गेले तर माणूस आणि कुत्रा हे हजारो वर्षांपासून एकत्र राहत आलेत. बऱ्याचदा कुत्रा आणि माणसाचे नाते हे मैत्रीपूर्ण असल्याचे दिसते, पण भटक्या कुत्र्यांचा विषय थोडा वेगळा आहे. त्यांना अन्नाच्या शोधात एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जावे लागते. या खाण्याच्या स्पर्धेत त्यांचा स्वभाव बदलत राहतो. ट्रॅफिकचा कर्णकर्कश आवाज, रस्त्यावर कचरा फेकण्याची सर्वसामान्यांची सवय रस्त्यावर चमकणारे दिवे याचा कुत्र्यांवर परिणाम होतो आणि ते आक्रमक होतात असे तज्ञांचे मत आहे.

केरळ वेटनरी अ‍ॅण्ड अ‍ॅनिमल सायंस युनिव्हर्सिटीचे डॉ. शिबू सायमन सांगतात की, कुत्र्याने हल्ला केलेल्या प्रत्येक घटनेमागे वेगवेगळी कारणं असू शकतात, पण जेव्हा हे कुत्रे कच्चे मांस खातात तेव्हा त्यांच्या जिभेवर याची चव रेंगाळत राहते आणि ते अनियंत्रित होतात. तर कधीकधी तर एखाद्याला घाबरवायचे म्हणूनदेखील कुत्रे आक्रमक होतात. त्यांच्यासाठी हा खेळ असतो. म्हणजे समजा एखादा व्यक्ती कुत्र्यांना बघून पळायला लागला तर कुत्र्यांना वाटतं की माणूस आपल्याला घाबरतोय. मग ते त्यांच्या मागे मागे पळतात, कधी तरी चावतात. ते सांगतात, प्रत्येक कुत्रा आपली टेरीटरी (विभाग) ठरवून घेतो. एकीकडे माणसांची लोकसंख्या वाढते आहे तर दुसरीकडे कुत्र्यांच्या संख्येतही झपाट्याने वाढ होत आहे. त्यामुळे त्यांची टेरीटरी लहान होत चालली आहे. आपल्या टेरीटरीचे संरक्षण करण्याच्या नादात कुत्र्यांना असुरक्षित वाटू लागते. जेव्हा एखादा माणूस त्यांच्या टेरीटरीमध्ये येतो तेव्हा ते आक्रमक होतात आणि हल्ला चढवतात. भटके कुत्रे आक्रमक होण्यामागे आणखीन एक कारण म्हणजे त्यांना खाऊपिऊ घालणाऱ्यांची सवय, पण आपण ते करण्यापासून कोणालाही रोखू शकत नसल्याचं अ‍ॅनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियाचे म्हणणे आहे.

भटक्या कुत्र्यांची संख्या कमी करण्यासाठी २००१ मध्ये सरकारने अँनिमल बर्थ कंट्रोल रूल्स (एबीसी) आणले. यात भटक्या कुत्र्यांची नसबंदी आणि लसीकरण आदी गोष्टींची चर्चा करण्यात आली. त्याअंतर्गत या कुत्र्यांची जबाबदारी प्राण्यांच्या कल्याणासाठी काम करणाऱ्या संस्था आणि स्थानिक सरकारी अधिकाऱ्यांकडे देण्यात आली. पनवेल महापालिका हद्दीत ही अशी सोय आहे, पण पूर्वी असे भटके कुत्रे पकडताना दिसायचे. पकडलेल्या कुत्र्यांवर नसबंदी करून नंतर त्यांना पुन्हा आणून सोडायचे, पण आता मात्र दिसत नाहीत. त्यामुळे नवीन पनवेल, कामोठे, कळंबोली व खारघर मध्येभटके कुत्रे रात्री मागे लागत असल्याची तक्रारी नागरिक करीत आहेत.

भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण आणण्यासाठी विविध याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या आहेत. केरळ सरकारनेही कुत्र्यांवर उपाय काढायची मागणी केली आहे. याबाबत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती जे. के. माहेश्वरी यांच्या खंडपीठासमोर पार पडलेल्या सुनावणीत न्यायालयाने काही महत्वपूर्ण सूचना दिल्या आहेत.

श्वानप्रेमींना कुत्र्यांना अन्न देण्याची सवय असते. नवीन पनवेल स्टेशन परिसरात अनेक महाविद्यालयीन मुली कुत्र्यांना खायला घालताना दिसतात, पण त्यामुळे काही वेळा लोकांना या कुत्र्यांचा त्रास सहन करावा लागू शकतो. लोकांची सुरक्षा आणि प्राण्यांचे हक्क यांमध्ये समतोल राखणे गरजेचे आहे. या समस्येवर तर्कशुद्ध तोडगा हवा, असे न्यायमूर्ती खन्ना यांनी म्हटले आहे. भटक्या कुत्र्यांनी नागरिकांवर हल्ला केल्यास कुत्र्यांना अन्न देणाऱ्या व्यक्तींना उपचारांचा खर्च करावा लागेल. तसेच त्यांच्यावर कुत्र्यांच्या लसीकरणाचीही जबाबदारी सोपवली जाऊ शकते, अशी सूचना न्यायालयाने केली आहे.



## बदलते तंत्रज्ञान

### आयफोनमधील फीचर आता व्हॉट्सअ‍ॅपवरही मिळणार

व्हॉट्सअ‍ॅपने एक नवीन फीचर रोलआऊट केलं आहे जे अँड्रॉइड आणि ळजड युजर्सना चॅट आणि ग्रुपमध्ये मेसेज पिन करण्याची सुविधा देतं. जेव्हा तुम्ही मेसेज पिन करता तेव्हा तो चॅट विंडोच्या टॉपवर दिसेल. सध्या कंपनी एकावेळी एकच मेसेज पिन करण्याची सुविधा देत आहे. जेव्हा तुम्ही एखाद्या मित्राला त्याने दिलेल्या लोकेशनवर भेटायला जात असाल किंवा तुम्ही चर्चेसाठी कोणताही महत्त्वाचा मेसेज मार्क केला असेल तर तुम्हाला या फीचरचा जास्त फायदा होईल.



व्हॉट्सअ‍ॅप युजर्ससाठी सातत्याने नवनवीन फीचर आणत असते. त्याचप्रमाणे आतादेखील पिन फीचरच्या मदतीने तुम्हाला चॅटमधील उपयुक्त माहिती लगेच मिळेल आणि तुम्हाला मेसेज शोधण्यात कोणतीही अडचण येणार नाही. कंपनी आगामी काळात अनेक मेसेज पिन करण्याची सुविधा देणार आहे. सध्या हे फीचर अँड्रॉइड बीटा टेस्टर्ससोबत उपलब्ध आहे.

अँड्रॉइडमध्ये कोणताही मेसेज पिन करण्यासाठी, तुम्हाला त्या मेसेजवर दीर्घकाळ प्रेस करावं लागेल. यानंतर तुम्हाला पिन मेसेजचा पर्याय मिळेल. त्यावर क्लिक करताच तुमचा मेसेज वरच्या बाजूला पिन होईल. तुम्ही केवळ मेसेज पिन करू शकणार नाही तर इमेजदेखील पिन करू शकता. iOSमध्ये मेसेज पिन करण्यासाठी, तुम्हाला तो उजवीकडे स्वाइप करावा लागेल.


**सेट करू शकता वेळ**

पिन मेसेज किती काळ ठेवायचा हेदेखील तुम्ही ठरवू शकता. कंपनी तुम्हाला २४ तास, सात दिवस आणि ३० दिवसांचा पर्याय देते. तुम्ही कोणताही एक पर्याय निवडू शकता. अ‍ॅप डिफॉल्टनुसार सात दिवसांचा पर्याय निवडतो. जर तुम्हाला मेसेज अनपिन करायचा असेल तर तुम्हाला हीच प्रक्रिया फॉलो करावी लागेल. या वेळी तुम्हाला Pinऐवजी Unpinचा पर्याय मिळेल.

लक्षात ठेवा, ग्रुप अ‍ॅडमिनिस्ट्रेटरने तुम्हाला तसं करण्याची परवानगी दिली तरच तुम्हाला ग्रुपमधील कोणताही मेसेज पिन करण्याची परवानगी दिली जाईल. परवानगीशिवाय तुम्ही ग्रुपमध्ये मेसेज पिन करू शकणार नाही. सध्या, कंपनी टप्प्याटप्प्याने हे फीचर जारी करत आहे जे तुम्हाला हळूहळू मिळेल.

# समाजसुधारक संत गाडगे महाराज

**निमित्त**



एक थोर आधुनिक मराठी संत व समाजसुधारक गाडगे महाराज यांचा जन्म शेणगाव (जि. अमरावती ) येथे २३ फेब्रुवारी १८७६ रोजी परीट जातीत झाला. वडिलांचे नाव झिंगराजी व आईचे सखूबाई. आडनाव जाणोरकार. त्यांचे मूळ नाव डेबूजी असे होते. तथापि त्यांचा वेश म्हणजे अंगावर फाटकी गोधडी आणि हातात गाडगे असा असल्यामुळे लोक त्यांना 'गोधडे महाराज' किंवा 'गाडगे महाराज' म्हणूनच ओळखत. संत गाडगे महाराज यांचा आज स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...

१९१२ मध्ये त्यांचा कुंताबाईशी विवाह झाला, परंतु संसारात त्यांचे मन रमले नाही. पुढे काही वर्षांनी घर सोडून तीर्थयात्रा करीत ते फिरू लागले. समाजातील कमालीचे अज्ञान, अनिष्ट चालीरीती व अंधश्रद्धा पाहून त्यांनी निरपेक्ष लोकसेवेचे व लोकशिक्षणाचे व्रत स्वीकारले. लहानपणापासूनच त्यांना भजन-कीर्तनांची आवड होती आणि त्यांची वृत्तीही धार्मिक व परोपकारी होती. समाजसुधारणेसाठी व लोकशिक्षणासाठी त्यांनी कीर्तनाचे माध्यम प्रभावीपणे वापरले. ते निरक्षर असले, तरी त्यांची भाषा सुबोध व सर्वसामान्यांच्या एकदम हृदयाला जाऊन भिडणारी होती. महाराष्ट्रात सर्वत्र तसेच गुजरात, कर्नाटक व आंध्र प्रदेशाच्या काही भागांत त्यांनी गावोगाव कीर्तने करून लोकजागृती केली. त्यांचा नैतिक उपदेश साधा व सर्वसामान्यांना उपयुक्त ठरावा असाच होता.

'चोरी करू नये, कर्ज काढून चैन करू नये, दारू पिऊ नये, देवापुढे पशूंचा बळी देऊ नये ', अशा प्रकारचा उपदेश ते आपल्या कीर्तनांतून मार्मिक उदाहरणे देऊन करीत. पारंपरिक, पारमार्थिक विषयांसोबतच व्यावहारीक व नैतिक विषयांचाही त्यांनी आपल्या कीर्तनांतून लोकजागृतीसाठी चांगला उपयोग करून घेतला.

स्वच्छता, प्रमाणिकपणा व भूतदया यांवर त्यांचा विशेष भर असे. तीर्थयात्रेच्या ठिकाणी ते जात; परंतु देवदर्शन न घेता मंदिराच्या बाहेर थांबून यात्रेकरूंची सेवा करीत व तेथील परिसर स्वतःच्या हातांनी स्वच्छ करी. खाण्यापिण्याच्या बाबतीतही त्यांचा कमालीचा साधेपणा होता. श्रीमंत भक्तांनी दिलेले चांगले अन्न ते भिकाऱ्यांना वाटून टाकीत आणि स्वतः गरिबाच्या घरची चटणी- भाकरी मागून आणून खात.

लहानपणापासूनच ते जातिपंथभेदातीत होते. जातिभेद नष्ट करून एकजिनसी समाज निर्माण व्हावा, असे त्यांना मनापासून वाटे व त्या दृष्टीने यांचे आचरण आणि प्रयत्नही असत. पंढरपूर, नासिक, त्र्यंबकेश्वर, आळंदी इ. ठिकाणी यात्रेकरूंचे अत्यंत हाल होत, म्हणून त्यांनी त्यांच्या सोयीसाठी प्रशस्त धर्मशाळा बांधल्या. विदर्भातील ऋणमोचन येथे त्यांनी लक्ष्मीनारायणाचे मंदिर उभारले व नदीवर घाटही बांधला. अनेक ठिकाणी त्यांनी गोरक्षण संस्थाही उभारल्या; तसेच अनाथांसाठी व अपंगांसाठी अनेक प्रकारे कार्य केले. समाजसेवा करणाऱ्या अनेक संस्थांनाही त्यांनी उदारहस्ते देणग्या दिल्या.

समाजात शिक्षणप्रसार करून अनेक शिक्षणसंस्थांना त्यांनी मदत केली. लोकांची त्यांच्यावर नितांत श्रद्धा होती; त्यामुळे लोकांनी त्यांना विपुल पैसा दिला. तो सर्व त्यांनी लोकोपयोगी कार्यात वेचला. त्यांनी उभारलेल्या सर्वच संस्थांचा कारभार विश्वस्त मंडळेच पाहतात.

गाडगे महाराजांविषयी बहुजनसमाजात कमालीचा आदरभाव आहे. त्यांनी महाराष्ट्रात केलेले लोकजागृतीचे व लोकसेवेचे कार्य अत्यंत मोलाचे आहे. प्रवास करीत असता अमरावतीजवळ त्यांचे अचानक निधन झाले. त्यांची समाधी अमरावती येथे आहे.

**(साभार : विकासपीडिया)**

**क्लिक...क्लिक...!**



**नवी मुंबई : रस्त्यावर वावरणाऱ्या मुलांचे जग वेगळेच असते. ही मुले कुठेही रमतात. बेलापूर येथे एका बसस्टॉपवर दोन गरीब लहान मुली कोणत्याही खेळण्यांशिवाय खेळण्यात दंग असताना तन्वी पवार यांनी टिपलेले छायाचित्र.**

## आरोग्य प्रहर

### 'ही' फळे रिकाम्या पोटी खाणे अधिक फायदेशीर

शरीरास पोषण देण्याच्या बाबतीत फळाला कोणताच पर्याय नाही. फळे शरीराला विविध प्रकारची व्हिटामिन्स देतात, मात्र तुम्हाला माहीत आहे का की काही फळे रिकाम्या पोटी खाल्ल्यास अधिक फायदा होतो. असे यासाठी कारण रिकामे पोट अधिक प्रमाणात पोषकतत्वे शोषून घेते. त्याचवेळेस आपली पाचनसंस्था अन्य खाद्य पदार्थांसोबत स्पर्धा करत नसते. अशातच आम्ही तुम्हाला अशा सात फळांबद्दल सांगणार आहोत ज्यांच्या रिकाम्या पोटी सेवनाने अधिकाधिक लाभ मिळू शकतात.



**पपई** - पपईमध्ये पपेन आणि कायमोपॅपेनसारखे एन्झाईम मोठ्या प्रमाणात असतात. हे एन्झाईम पचनशक्ती सुधारण्यासाठी बद्धकोष्ठता रोखण्यासाठी जबाबदार आहेत. जेव्हा पपईचे रिकाम्या पोटी सेवन केले जाते तेव्हा पपईमधील व्हिटामिन ए, सी आणि ई चांगल्या प्रमाणात शरीरात शोषले जातात.

**टरबूज** - जर तुम्ही सकाळी उठल्यावर टरबूज खात असाल तर संपूर्ण रात्रभरानंतर हे तुमचे शरीर हायड्रेट ठेवण्याचे काम करते. कारण यात ९२ टक्के पाणी असते. यात लायकोपीन हे अँटी ऑक्सिडंट असते.

**ब्लू बेरी** - सकाळी सकाळी जर गोड खायची इच्छा झाली तर ब्लू बेरी खा. यात अँटी ऑक्सिडंट असतात जे रिकाम्या पोटी खाल्ल्याने मेंदूला उर्जा मिळते. तसेच शुगरही कंट्रोलमध्ये राहते.

**केळी** - सकाळी सकाळी केळी खाल्ल्याने शरीरास भरपूर उर्जा मिळते. यातील कार्बोहायड्रेट आणि नैसर्गिक शर्करा मोठ्या प्रमाणात असते.

**अननस** - अननस रिकाम्या पोटी खाण्यासाठी चांगले फळ आहे. यात व्हिटामिन सी आणि मँगनीज भरपूर प्रमाणात असते. यामुळे रोगप्रतिकारक क्षमता सुधारते. तसेच हाडेही मजबूत होतात.

**सफरचंद** - दररोज एक सफरचंद खाल्ल्याने डॉक्टर दूर राहतात ही म्हण खरी आहे. जेव्हा रिकाम्या पोटी सफरचंद खातो तेव्हा ते आरोग्यासाठी चांगले असते. यात फायबर असतात जे पचनासाठी चांगले असतात. तसेच भूक नियंत्रित करण्यास मदत करतात.

**किवी** - किवी भले छोटे फळ आहे मात्र हे रिकाम्या पोटी खाल्ल्याने मोठे फायदे होतात. यामुळे रोगप्रतिकारक क्षमता वाढते.

## निवडक

### उज्ज्वला गॅस योजनेबाबत जनजागृती



**चौक** : आपल्या घरगुती गॅसची ई-केवायसी, सबसिडी आणि उज्ज्वला गॅस योजनेची जनजागृती करण्यासाठी मंगळवारी (दि. १९) ग्रुप ग्रामपंचायत चौक येथे माहिती शिबिर आयोजित करण्यात आले होते. भाजप युवा मोर्चा अध्यक्ष प्रसाद देसाई यांनी याबाबत चौक सरपंच रितू ठोंबरे यांना निवेदन दिले होते. या वेळी सबसिडीसाठी ४६१ व उज्ज्वला गॅस योजनेसाठी ६७ लोकांनी आपली ई-केवायसी करून घेतली. या शिबिरामुळे अनेक ग्राहकांची सोय झाली, असे सरपंच रितु ठोंबरे यांनी सांगितले. या वेळी सदस्य ऋषाली पोळेकर, सौ. दबके, महेश पोलेकर यांच्यासह भाजपचे कार्यकर्ते उपस्थित होते.

### नागावमध्ये एलपीजी केवायसी शिबिर



**रेवदंडा** : नागाव ग्रामपंचायतीच्या सभागृहात मंगळवारी (दि. १९) एलपीजी गॅस ई-केवायसी शिबिर झाले. एलपीजी गॅस सबसिडीसाठी केवायसी म्हणजेच एलपीजी गॅस कार्ड आधार कार्डसोबत लिंक करून घेणे होय. या शिबिरास एलपीजी गॅसचे कर्मचारीवर्ग तसेच नागाव ग्रामपंचायत सरपंच हर्षदा निखिल मयेकर, उपसरपंच सुरेंद्र नागलेकर, सदस्य निखिल मयेकर, आदेश मोरे, सुरज म्हात्रे, रोहन नाईक, अनिरूद्ध राणे, सदस्या मंगळा नागे, सुप्रिया म्हात्रे, प्रियंका काठे, निकिता पाडेकर, रोहिणी घरत, विणा पिंपळे, लीना म्हात्रे, अंकिता शेवडे आदी उपस्थित होते.



**धाटाव : भाजप अल्पसंख्याक सेलचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष रईस कादरी यांना सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.**

## मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी शासनाचा प्रयत्न

# लेक लाडकी योजनेचा लाभ घ्या

### डॉ. भरत बास्टेवाड यांचे आवाहन

**अलिबाग : प्रतिनिधी**

मुलींचा जन्मदर वाढविणे तसेच मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी माझी कन्या भाग्यश्री योजना शासनाने २०१७पासून सुरू केली होती. माझी कन्या भाग्यश्री ही योजना ३१ मार्च २०२३पासून बंद करण्यात आली असून, १ एप्रिल २०२३पासून शासनाने लेक लाडकी ही योजना सुरू केली आहे. लेक लाडकी ही योजना मुलींच्या उज्ज्वल भविष्यासाठी लाभदायी असून, या योजनेची माहिती प्रत्येक ग्रामसभेत देण्यात यावी, तसेच जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी केले आहे.



माझी कन्या भाग्यश्री ही योजना २०१७पासून राबविण्यात येत होती. या योजनेंतर्गत मुलीच्या जन्मानंतर एका वर्षाच्या आत पालकांनी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केली तर ५० हजार रुपये, तसेच दोन मुलींच्या जन्मानंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केली, तर दोन्ही मुलींच्या नावावर प्रत्येकी २५ हजार रुपये ठेवण्यात येत होते. रायगड जिल्ह्यात या योजनेंतर्गत ४८७ मुलींना लाभ देण्यात आला आहे. ही योजना ३१ मार्च २०२३ पासून बंद करण्यात आली असून, १ एप्रिल २०२३पासून शासनाने लेक लाडकी ही योजना सुरू केली आहे.

लेक लाडकी या योजनेंतर्गत पिवळ्या व केशरी शिधापत्रिकाधारक कुटुंबात मुलीच्या जन्मानंतर पाच हजार रुपये, इयत्ता पहिलीत सहा हजार रुपये, सहावीत सात हजार रुपये, ११वीत आठ हजार रुपये तर लाभार्थी मुलीचे वय १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर तिला ७५ हजार रुपये याप्रमाणे एकूण एक लाख एक हजार रुपये एवढी रक्कम देण्यात येईल, असे या योजनेचे स्वरूप आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेच्या महिला व बालविकास विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी निर्मला कुचीक यांनी दिली आहे.

**आवश्यक कागदपत्रे**

- लाभार्थीचा जन्माचा दाखला
- कुटुंबप्रमुखाचा उत्पन्नाचा दाखला (वार्षिक उत्पन्न एक लाखापेक्षा जास्त नसावे)
- रेशनकार्ड (पिवळे किंवा केशरी)
- लाभार्थीचे आधार कार्ड (प्रथम लाभावेळी ही अट शिथील राहील)
- पालकांचे आधार कार्ड
- बँक पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत

## खोपोली तालुक्यात माळरानावर वणवा

### वनसंपदा जळून खाक; गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर



**खोपोली : प्रतिनिधी**

पावसाळा संपला की, जमिनीतील कमी होतो. त्यामुळे तिथे असलेले गवत सुके होते. हे सुके गवत शेतकऱ्यांना गुरांसाठी अत्यंत महत्त्वाचे असते, परंतु काही अज्ञातांनी वणवा लावल्याने तिथे असलेले गवत पूर्णपणे जळून जाते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या गुरांसाठी जंगलातील चारा मिळणे कठीण होते. यामध्ये प्राणी, पक्षांची घरटी, रानातील औषधी वनस्पती या वणव्यामुळे जळून खाक होत आहेत. वणवा लागला जात असलेल्या जीवष्टीचा ऱ्हास होत आहे.

काही वर्षांपूर्वी पावसाळा संपला की, सुके गवत पेटवून देणे म्हणजे पुढच्या वर्षी चांगले गवत येईल, अशी समजूत होती, परंतु यामुळे निसर्गसंपत्तीचा ऱ्हास होत आहे. याकडे वनविभागाने गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी होत आहे.

## व्यापारी संघटनेची स्थापना

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली-पेण महामार्गवरील डोणवत बाजारपेठ ठिकाणी व्यापाऱ्यांनी आदर्श व्यापारी संघटनेची स्थापना केली आहे. संघटनेच्या नामफलकाचे अनावरण खालापूर वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळासाहेब कुंभार यांचे हस्ते झाले.

या वेळी तांबाटी सरपंच अविनाश आमले, उपसरपंच शीतल पाटील, सदस्य रितेश मोरे, संघटनेचे अध्यक्ष ॲड. अमोलराजे बांदल-पाटील आदींसह व्यापारी बांधव उपस्थित होते. सरपंच अविनाश आमले आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळासाहेब कुंभार यांनी व्यापाऱ्यांना मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी व्यापारी संघटनेच्या सर्वच पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## चिंचवलीच्या उपसरपंचपदी सुप्रिया भगत बिनविरोध

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील चिंचवली ग्रुप ग्रामपंचायतीमधील सदस्य आणि भाजपच्या कार्यकर्त्या सुप्रिया राजेश भगत यांची ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी बिनविरोध निवड करण्यात आली. रोशन पाटील यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने उपसरपंचपदाची निवडणूक मंगळवारी (दि. १९) घेण्यात आली.

चिंचवली उपसरपंच रोशन पाटील यांनी राजीनामा दिल्याने उपसरपंचाची जागा रिक्त झाली होती. या जागेसाठी पिठासिन अधिकारी ग्रामपंचायतीच्या सरपंच सुनीता आहीर यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक घेण्यात आली. निर्धारित वेळेत उपसरपंच पदासाठी सुप्रिया राजेश भगत यांचा एकमेव अर्ज दाखल झाला होता. त्यामुळे त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे पिठासिन अधिकारी सरपंच आहीर यांनी जाहीर केले. विशेष बैठकीला ग्रामपंचायत सदस्य ऋषिकेश भगत, रोशन पाटील, सुषमा बोराडे, जोत्सना भगत, आणि सुप्रिया भगत आदी उपस्थित होते. पिठासिन अधिकारी यांना ग्रामविकास अधिकारी सूरज मुकादम यांनी सहकार्य केले.

सुप्रिया भगत यांची निवड झाल्यानंतर त्यांचे अभिनंदन करण्यासाठी भाजप जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, तालुकाध्यक्ष राजेश भगत, महिला तालुकाध्यक्ष नम्रता कांदळगावकर, तालुका सरचिटणीस संदीप म्हसकर, नितीन कांदळगावकर तसेच भाजप महिला मोर्चा पदाधिकारी स्नेहा गोगटे, वर्षा सुर्वे, शर्वरी कांबळे, सर्वेश गोगटे, नेरळ शहर अध्यक्ष बंटी कुलकर्णी, राहुल मुकणे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. नवनिर्वाचित उपसरपंच भगत यांनी माजी आमदार सुरेश लाड यांचे आशीर्वाद घेतले.



## भाजपच्या सुधागड तालुका पदाधिकाऱ्यांची निवड

### प्रणाली शेठ महिला मोर्चाध्यक्ष, तर तालुका चिटणीसपदी ज्ञानेश्वर फोंडे

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यात भाजपने पक्षवाढीसाठी तालुका पदाधिकाऱ्यांची निवड जाहीर केली आहे. पालीतील प्रणाली संजोग शेठ यांची भाजप सुधागड तालुका महिला मोर्चा अध्यक्षपदी तर ज्ञानेश्वर चंद्रकांत फोंडे यांची सुधागड तालुका चिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली आहे.





प्रणाली शेठ या संघटन कौशल्य असलेल्या सक्रिय कार्यकर्त्या आहेत. भाजप पक्षवाढीसाठी त्यांच्याकडून विशेष प्रयत्न होत असल्याचे दिसते. दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांच्या मान्यतेने, सुधागड तालुकाध्यक्ष श्रीकांत ठोंबरे यांनी ही निवड केली आहे. आपल्यावर सोपवलेली जबाबदारी निष्ठेने व प्रामाणिकपणे पार पाडणार आहे. याबरोबरच पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या मदतीने भाजप तळागाळात नेण्यासाठी व संघटन मजबूत करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे या वेळी प्रणाली शेठ यांनी सांगितले.

ज्ञानेश्वर फोंडे हे भाजपची ध्येय धोरणे, उद्दीष्टे गाव खेड्यापाड्यात पोहचविण्यासाठी अविरतपणे मेहनत घेत आहेत. केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून राबविल्या जाणाऱ्या लोकाभिमुख जनकल्याणकारी योजना तळागाळात पोहचविण्यासाठी फोंडे जनजागृतीदेखील करीत आहेत. दरम्यान आपल्यावर पक्षाच्या वरिष्ठ नेतेमंडळी यांनी सोपवलेली जबाबदारी आनंदाने स्वीकारली असून येत्या काळात भाजप संघटनेला अधिकाधिक बलाढ्य व मजबूत करण्याच्या दृष्टीने काम करणार असल्याची ग्वाही फोंडे यांनी बोलताना दिली.

## मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील अनधिकृत टपऱ्यांवर हातोडा

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील खालापूर तालुक्याच्या हद्दीतील साजगाव व सारसन या गावाजवळील रस्त्याच्या दोन्ही बाजूकडील अनधिकृत टपऱ्या रस्ते विकास महामंडळाने पोलीस पाट्यासह धडक मोहीम राबवून मंगळवारी (दि. १९) जमीनदोस्त केल्या. काही स्थानिक टपरीधारकांनी विरोध करण्याचा प्रयत्न केला, परंतु अधिकाऱ्यांनी शेवटपर्यंत ही मोहीम राबवून अनेक टपऱ्या पाडण्यात आल्या.

अनेक दिवसांपासून महामार्गावर खोपोली हद्दीतील साजगाव व सारसन या गावाच्या हद्दीतील रस्त्याच्या दोन्ही बाजूस मोठ्या प्रमाणात चहा टपरी, पंक्चर व तंबाखूजन्य पदार्थ विक्री करणाऱ्या टपऱ्या वाढतच होत्या. मुंबई-पुणे महामार्गावर राज्य शासनाने केवळ खोपोली जवळच विश्रांतीसाठी फुडमॉल परिसरात थांबा दिला आहे. या ठिकाणी दुकानमालक महागडे



भाडे भरून व्यवसाय करीत आहेत, परंतु या अनधिकृत टपऱ्यांमुळे प्रवासी मॉलमध्ये न जाता रस्त्यावरील टपऱ्यांवर जात असल्याने मॉलमधील गाडी मालकांचे नुकसान होत असल्याचे बोलले जात होते. वाहनचालक रस्त्याच्या दोन्ही बाजूला वाहने उभी करीत होते.

संभाव्य कुठलीही अपघाताची घटना घडू नये यासाठी अनधिकृतपणे टपऱ्यांवर व्यवसाय करणाऱ्यांविरोधात रस्ते विकास महामंडळाने ही धडक कारवाई करून अनेक टपऱ्या जमीनदोस्त केल्या. रस्ते विकास महामंडळाच्या या धडक कारवाईचे सर्वत्र स्वागत करण्यात येत आहे.

## भाजप युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीसपदी रोशन चाफेकर

**धाटाव : प्रतिनिधी**

काही महिन्यांपूर्वीच रोह्यातील रोशन चाफेकर यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला होता. पक्ष नेतृत्वाने भाजप युवा मोर्चा दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीसपदी त्यांची नियुक्ती केली आहे.



चाफेकर यांना रायगड जिल्हा आदर्श युवा पुरस्कार, राजिपच्या वतीने कोरोना योद्धा पुरस्कार, सुराज्य संघटनेस केंद्र सरकार वतीने सर्वोत्कृष्ट युवा मंडळ पुरस्कार यांसारख्या सन्मानाने त्यांना गौरविण्यात आले आहे.

लोकसभा प्रमुख सतीश धारप, आमदार प्रशांत ठाकूर, खासदार विनय सहस्त्रबुद्धे, रोहा तालुकाध्यक्ष अमित घाग यांचे वेळोवेळी लाभलेले मार्गदर्शन व पाठिंबा आज इथे पोचण्यासाठी कारणीभूत ठरले. आगामी काळात पक्षवाढीसाठी व देशसेवेसाठी प्रथम राष्ट्र, नंतर पक्ष, शेवटी स्वतः या तत्वावर काम करेन, असे आश्वासन त्यांनी दिले.


## महाराष्ट्र शासन

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**

**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

**निविदा सूचना क्रमांक १०२ सन २०२३-२०२४**

खालील कामासाठी सिलबंद निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड, मु.पो.ता.महाड, जिल्हा. रायगड पिनकोड नं. ४०२३०१ दूरध्वनी क्रमांक ०२१४५ २२२१६७ हे महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून बी-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. को-या निविदा नमुना **दिनांक २०/१२/२०२३ रोजी सकाळी १०.०० पासून ते दिनांक २७/१२/२०२३ रोजी १८.०० वाजे** पर्यंत **www.mahapwd.gov.in** या संकेत स्थळावरुन ऑनलाईन खरेदी करण्यांत येतील. व **दिनांक २८/१२/२०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता ऑफलाईन पध्दतीने या कार्यालयात सादर कराव्यात** व कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, महाड हे भरुन पाठविलेल्या निविदा शक्यतो **दिनांक २८/१२/२०२३ रोजी ११.०० वाजता** उघडतील. निविदा उघडताना सर्व कंत्राटदारांची उपस्थित रहाने आवश्यक आहे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखुन ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कोशिबळे तर्फे तळे रस्ता ग्रा.मा. १६ कि.मी. ०/०० ते ०/५३० मध्ये सुधारणा करणे, तालुका माणगांव, जिल्हा रायगड. | ९५६६१५ | १०००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| २ | सां.बा. विभाग माणगांव येथील पुल क्वार्टरची विशेष दुरूस्ती करणे. (प्लास्टार, रंगकाम, वॉटर सप्लाय आणि सॅनिटरी) तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (२२१६) | ९३३५०८ | १०००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ३ | सां.बा. विभाग माणगांव येथील (डी. ई.) क्वार्टरची विशेष दुरूस्ती करणे. तालुका माणगांव जिल्हा रायगड. (२२१६) | ९६६९३४ | १०००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ४ | मौजे कोशिबळे ग्रा.पं. दाखगे ता. माणगांव कोशिबळे ते निजामपूर येथे सामाजिक सभागृह बांधणे. तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (डोंगरी) | ८०९५२४ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ५ | माणगाव येथील जिल्हा न्यायाधीश क्वार्टरची विशेष दुरूस्ती करणे. (रंगकाम, दरवाजे, खिडक्या,) तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (२२१६) | ८३५१५४ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ६ | मौजे टोळ खु. येथे सामाजिक सभागृह बांधणे, तालुका गहाड, जिल्हा रायगड. | ८९२२०३ | ९००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ७ | माणगांव येथील न्यायालय इमारतीची विशेष दुरूस्ती करणे. ता. माणगांव, जिल्हा रायगड. (रंगकाम करणे, पाणीपुरवठा व स्वच्छता) (२०५९) | ६९०९६२ | ७००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ८ | मौजे वसाप येरुणकरवाडी येथे विसर्जन घाट बांधणे, तालुक महाड, जिल्हा रायगड. (२५१५) | ५७१२८६ | ६००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ९ | मौजे दाभोळ ग्रा.पं. दाभोळ ता. महाड येथे ग्रा.पं. कार्यालय कडे जाणारा रस्ता तयार करणे, तालुका महाड, जिल्हा रायगड (डोंगरी) | ५६४२०६ | ६००० | ५९०/- | ६ महिने | वर्ग सात व वरील |

**टिप :-** १) तपशिलवार निविदा सुचना https://mahapwd.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/५७३६**
**दिनांक : १८/१२/२०२३**

**सही/**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

**विमाका/ कोवि/२०२३-२०२४/२५२**

## निवडक



### उरण-शिर्डी पालखीचे प्रस्थान

**उरण :** श्री साई सेवा मंडळ उरण तालुका, देणगीदार, जनता यांच्या वतीने भव्य पालखी, वारकरी दिंडी पदयात्रा रविवारी (दि. १७) शिर्डीकडे प्रस्थान झाली. २५ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी १० वाजता श्री क्षेत्र पुण्यधाम शिर्डी येथे पोहचणार आहे. पालखी दिंडीच्या सांगता प्रित्यर्थ श्री साई भंडारा व श्री सत्य नारायणाची महापूजा ६ जानेवारी २०२४ रोजी श्री रत्नेश्वरी मंदिर, जसखार, उरण येथे होणार आहे. रविवारी (दि. १७) सकाळी ७ वाजता श्रींची पालखी व पादुका साई भक्तांच्या दर्शनासाठी श्री दत्त मंदिर देऊळवाडी येथे ठेवण्यात आले होते.

### चिरनेरच्या माजी विद्यार्थ्यांची सहल



**उरण :** सेकंडरी स्कूल चिरनेर दहावी १९८५ ग्रुपची सहल १६ आणि १७ डिसेंबर रोजी कोकणचे महाबळेश्वर अशी ओळख असलेल्या दापोलीमध्ये गेली होती. दोन दिवसांच्या या सहलीत दापोली कृषी विद्यापीठ, उंबरले काजू फॅक्टरी, दाभोळ येथील गुहेतील चण्डिका माता, दाभोळ जेट्टी, आंजर्ले येथील कड्यावरचा गणपती, गोवा गड, हर्णे बीच, करदे मुरुड बीच पाहिले. प्रत्येक सहलीत छत्रपती शिवाजी महाराजांचा एक किल्ला पहायचा असे या वर्गमित्रांनी ठरवले असल्याने या सहलीत गोवा गड पाहिला.

### ओएनजीसीतर्फे रक्तदान शिबिर

**उरण :** रक्तदानाविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने व गोरगरिबांना वेळेत रक्त उपलब्ध व्हावा या अनुषंगाने ओएनजीसी उरण प्लांटच्या वतीने बुधवारी (दि. २०) ओएनजीसी मेन गेट, द्रोणागिरी भवन उरण येथे सकाळी ७ ते सायंकाळी ६ या वेळेत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. रक्तदात्यांनी रक्तदानाला येताना कोणतेही एक ओळखपत्र (आधारकार्ड, पैनकार्ड, मतदान कार्ड, काम करीत असलेल्या कंपनीचे ओळखपत्र) सोबत आणावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी नागरिकांनी, रक्तदात्यांनी ओएनजीसी उरण प्लांटचे अध्यक्ष प्रकाश दळवी यांनी दिली.

### थंडी व थर्टीफस्टवर कविसंमेलन

**उरण :** कोमसाप (कोकण मराठी साहित्य परिषद) व उरण मधुबन कट्टा विमला तलाव यांच्या माध्यमातून विमला तलाव येथे महिन्यातून एकदा कविसंमेलन भरविले जाते. या वेळीही विमला तलाव येथे कविसंमेलन उत्साहात झाले. या कविसंमेलनाचे अध्यक्ष सूर्यकांत दांडेकर, स्वागताध्यक्ष सी.बी.म्हात्रे होते. कवितेचा विषय आला थंडीचा महिना आणि थर्टीफस्ट मजा आणि सजा असे होते. या वेळी निमंत्रित कवी म्हणून छोट्या पडद्यावरील अभिनेत्री प्रज्ञा म्हात्रे नवी मुंबई तसेच नरेश पाटील अलिबाग यांची उपस्थिती होती.



# नवी मुंबईत ई-कचऱ्याचे नियोजन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई महापालिका हद्दीतील गावठाण आणि झोपडपट्टी भागात कचरा गोळा करण्यासाठी सद्यस्थितीत राबविण्यात येणाऱ्या घंटागाडी पद्धतीस पुरेशा प्रमाणात यश मिळत नसल्याने येत्या काळात या भागातील कचरा वाहतुकीची यंत्रणा प्रभावी पद्धतीने राबवली जावी यासाठी महापालिका प्रशासनाने नवी रचना उभी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार या भागात लहान आकाराची ई-वाहने तसेच गल्लीबोळातून कचरा गोळा करण्यासाठी अतिरिक्त सफाई कर्मचाऱ्यांची कुमक ठेवली जाणार आहे.



महापालिकेने तयार केलेल्या नव्या कचरा संकलन व वाहतूक निविदेत प्रथमच ई-कचरा गोळा करण्यासाठी विशेष व्यवस्था असणार आहे. त्यासाठी २० ई वाहनांचा वापर केला जाणार आहे. शहर स्वच्छतेबरोबरच कचरा वर्गीकरणाकडे महापालिकेने अधिक लक्ष केंद्रित केले आहे.

नव्या निविदेत विविध पद्धतीचा कचरा वेगळा करण्याचा महापालिकेचा मानस आहे. यापूर्वी एकत्रित कचरा संकलन केले जात होते. नव्याने काढण्यात येणाऱ्या कामात शहरात ओला व सुका कचऱ्याच्या वर्गीकरणाप्रमाणेच घरगुती घातक कचरा वर्गीकरण तसेच नव्याने प्लास्टिक, लाकूड, काच, धातू अशा कचऱ्याचे वर्गीकरण करून कचरा संकलन केले जाणार आहे. देशभरात सर्वत्र इलेक्ट्रिक गाड्यांचा वापर सुरू झाला असताना कचरा वाहतुकीसाठीही पालिकेच्या इतिहासात प्रथमच कचरा वाहतुकीसाठी २० छोट्या विद्युत गाड्यांचा वापर केला जाणार आहे.

अत्याधुनिक पद्धतीने कचरा वाहतूक व संकलनासाठी वेगवान प्रक्रिया राबवून कचरा वाहतूक व संकलन निविदा काढण्यात येणार आहे. त्यासाठी ई वाहनांचाही वापर केला जाणार आहे. नव्या निविदेत मूळ गावठाण भागात ई-वाहनाद्वारे कचरा गोळा होईल, असे पालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी सांगितले.

## परिवहन बस फेऱ्या वाढविण्याची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई मनपा परिवहन बस क्रमांक १५ व २० बस फेऱ्या सुरळीत करणे करून फेऱ्यात वाढ करावी आणि सीवूड्समधील प्रवाशांना जलद आणि उत्तम सेवा द्यावी, अशी मागणी माजी नगरसेवक भरत जाधव यांनी प्रशासनाला केली आहे.

सीवूड्स विभागातील नागरिकांनी बस क्रमांक १५ आणि २० सेवेच्या दैनंदिन होणाऱ्या त्रासाबाबत केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तुर्भे आणि घणसोली डेपो व्यवस्थापक यांच्याशी चर्चा केली.

बस क्रमांक २० घणसोली डेपोवरून तर बस क्रमांक १५ ही तुर्भे डेपोमधून सुटत असते बस क्रमांक १५च्या २ बसच्या माध्यमातून ३५ मिनिटाला १ फेरी व बस क्रमांक २०च्या ११ बसेसच्या माध्यमातून साधारण २० मिनिटाला १ फेरी अशी प्रवाशांना परिवहन सेवा दिली जात असल्याचे आढळून आले.

परिवहन विभागाकडून बस क्रमांक १५ व २० ठरलेल्या बस संख्यानुसार फेऱ्या न करता जवळपास अर्ध्याच बसच्या माध्यमातून या दोन्ही मार्गावर प्रवासी वाहतूक सेवा दिली जाते. त्यामुळे बस क्रमांक १५ ही ३५ मिनिटाऐवजी एक तास १० मिनिटांनी येते तर बस क्रमांक २० ही २० मिनिटाऐवजी ४० मिनिटांनी असे स्पष्ट झाले. त्यामुळे प्रवासांचे प्रचंड हाल होत आहेत. दोन्ही मार्गावरील बस संख्या व फेऱ्या सुरळीत करण्यात याच्या किंबहुना वाढवण्यात यावा, अशी विनंती माजी नगरसेवक भरत जाधव यांनी केली. पुढील आठ दिवसांत बस सेवा पूर्ववत करण्यात येईल, असे आश्वासन प्रशासनाने दिले असल्याचे जाधव यांनी सांगितले.

## खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयाची स्टोअर्स व्हिजिट

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयातील अकाउंट व फायनान्स विभागातर्फे शनिवारी (दि. १९) ओवेपेठ गावातील रामशेठ ठाकूर न्यू इंग्लिश स्कूल मधील विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी स्टोअर्स व्हिजिटचे आयोजन केले होते.



या वेळी महाविद्यालयातील अकाउंट व फायनान्स शाखेतील प्रा. योगिता पाटील व प्रा. तनुजा सुमन यांनी व विद्यार्थी व विद्यार्थिनींनी न्यू इंग्लिश स्कूल मधील पाचवी ते दहावीच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या समवेत खारघर येथील डी वाय आय स्टोअर्सला भेट देऊन तेथील वस्तूंचे स्टोरेज, खरेदी-विक्री वेगवेगळ्या मालांचे भाव, व्यवहार कसे चालतात हे प्रत्यक्षात पाहिले व अनुभवले. न्यू इंग्लिश स्कूल मधील पाचवी ते दहावीच्या सुमारे ३० विद्यार्थी व विद्यार्थिनींनी ह्या स्टोअर्स व्हिजिटचा लाभ घेतला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी हा उपक्रम यशस्वीरित्या घेतल्याबद्दल अकाउंट व फायनान्स विभागातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी व विद्यार्थिनींचे अभिनंदन केले व पुढील उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या. या स्टोअर्स व्हिजिटचे आयोजन प्रा. प्रवर शर्मा यांनी केली तसेच प्रा. करिष्मा कडव व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

## नवी मुंबईत 'उबाठा'ला खिंडार; प्रमुख पदाधिकारी शिंदे गटात

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई उर्वरित शिवसेनेला सोमवारी मोठे खिंडार पडले आहे. १४० प्रमुख पदाधिकारी तसेच सक्रिय कार्यकर्त्यांनी प्रवेश केल्याने शिंदे शिवसेनेची ताकद वाढली आहे, असे प्रतिपादन शिवेसना शिंदे गटाचे नेते प्रमुख नरेश म्हस्के यांनी केले. तर ठाणे लोकसभेचा पुढील खासदार शिवसेनेचाच असणार असा विश्वास उपनेते विजय नाहटा यांनी व्यक्त केला.

नवी मुंबई उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाचे शेकडो कार्यकर्ते व प्रमुख पदाधिकाऱ्यांनी सेनेला जय महाराष्ट्र करीत शिंदे गटात प्रवेश केला. तसेच वंचित बहुजन आघाडीचे नवी मुंबई अध्यक्ष शिंदे गटात आले आहे.

शिवसेना ठाकरे गटात कशी घुसमट होते याचा अनुभव सर्वांनी घेतला आहे. शिवसेना बदललेली नाही तर केवळ नेतृत्व बदलले आहे. आता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून शिवसेनेत आलेल्या अनेकांना पदेही दिली आहेत. जुने-नवे असा वाद होऊ न देण्यासाठी योग्य ती काळजी घेतली जात आहे, असे नाहटा यांनी सांगितले. घुसमट सहन न झाल्याने उ.बा.ठा सेनेला 'जय महाराष्ट्र' केल्याचे मनोगत शिंदे गटात आलेल्या नेत्यांनी व्यक्त केले.

शहर प्रमुख विजय माने, माजी विरोधीपक्ष नेते दिलीप घोडेकर उपजिल्हा प्रमुख मिलिंद सूर्यराव, माजी नगरसेवक मनोहर जोशी असे एकूण १४० तर वंचित बहुजन आघाडीचे नवी मुंबई अध्यक्ष भूषण कासार यांनीही शिवसेना शिंदे गटात प्रवाह केला.





**कळंबोली : प्रभाग ९ मधील रोडवरील स्ट्रीट लाईटवर झाडांच्या फांद्या आल्या असल्याने परिसरात काळोख होत होता. या रस्त्यावरून जाणाऱ्या वाहनचालकांच्या अंगावर फांद्या पडत होत्या. त्यामुळे भाजप कळंबोली शहर अध्यक्ष रविनाथ पाटील व उपाध्यक्ष विनोद बोरसे यांनी पनवेल महापालिकेच्या माध्यमातून संबंधित झाडाच्या फांद्या छाटून घेतल्या.**

## उरणमध्ये रस्त्यालगतच्या गवताला आग

### संबंधितांवर कारवाई करण्याची नागरिकांची मागणी

**उरण : प्रतिनिधी**

द्रोणागिरी नोड परिसरातील पाणजे गावाला जोडणाऱ्या मार्गावरील गवताळा आग लावण्यात आली आहे. या आगीत रस्त्याच्या दुभाजक व कडेला असलेल्या वृक्षांची ही होळी होत आहे. यामध्ये सिडकोकडून लाखो रुपये खर्चून लागवड करण्यात आलेली झाडे ही आगीच्या भक्ष्यस्थानी पडत आहेत. सिडकोने संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.



उरण द्रोणागिरी नोड परिसराचा विकास सिडकोच्या माध्यमातून करण्यात येत आहे.त्यामुळे या परिसराचा कायापालट आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी या ठिकाणा वरील गवताची छाटणी, विविध प्रकारच्या झाडांचे संवर्धन, जतन करण्यासाठी सिडकोकडून लाखो रुपये खर्च करण्यात येत आहेत, परंतु गवत छाटणीचा ठेका घेणारे ठेकेदार सिडकोच्या भूखंडावरील गवताची छाटणी न करता त्या गवताळा आग लावण्याचे काम करत आहेत. त्यामुळे या परिसरातील झाडे भक्ष्यस्थानी पडून प्रदुषणात वाढ होत आहे. तरी सिडकोच्या द्रोणागिरी नोड परिसरातील भूखंडा वरील गवताची छाटणी न करता स आगी लावण्यात येत आहेत. त्यामुळे सिडकोचे लाखो रुपये वाया जात आहेत. तर सिडकोने वारंवार घडणाऱ्या आगीच्या घटनांची चौकशी करावी, अशी मागणी सिडकोकडे नागरिकांनी केली आहे.

## सीकेटी महाविद्यालयात निवडणूक साक्षरता कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना पदव्युत्तर पदवी विभाग आणि आजीवन अध्ययन आणि विस्तार विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने खांदा कॉलनी येथील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स आणि सायन्स महाविद्यालयामध्ये निवडणूक साक्षरता कार्यक्रम मंगळवारी (दि. १९) झाला.



या कार्यक्रमाला मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे प्रभारी संचालक डॉ. कुणाल जाधव आणि महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक एस के पाटील उपस्थित होते. चांगू काना ठाकूर महाविद्यालयाने १०० टक्के साक्षरतेचा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन निवडणूक साक्षरतेचे विविध कार्यक्रम राबविण्यास सुरुवात केली आहे. त्यांची माहिती देताना प्राचार्य पाटील यांनी विद्यापीठाच्या या उपक्रमाचे कौतुक केले.

समाजामध्ये निवडणूक साक्षरता वाढीस लागावी या यातूने मुंबई विद्यापीठाने या कार्यक्रमाची आखणी केलेली आहे. या कार्यक्रमाच्या शृंखलेची सुरुवात सर्वप्रथम मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रोफेसर रवींद्र कुलकर्णी यांनी केली आणि विद्यापीठाच्या सर्व विद्यार्थ्यांनी निवडणूक साक्षर व्हावे, असे आवाहन केले होते. यामध्ये मुंबई विद्यापीठातील सर्व महाविद्यालयीन प्राध्यापक व विद्यार्थी यांनी निवडणूक साक्षरता मोहिमेमध्ये सहभाग घ्यावा, असे आवाहन कुलगुरूंनी केले. त्याला अनुसरून हा कार्यक्रम सीकेटी महाविद्यालयात झाला. त्यांच्या आवाहनाला अनुसरून ही श्रृंखला अशीच पुढे ठाणे, पालघर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये चालू राहणार आहे. या कार्यक्रमात सुमारे ६० महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला. ६५ प्राध्यापक आणि १५८ विद्यार्थी यांनी सहभाग घेतला. या कार्यशाळेच्या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून पनवेल तालुक्याचे नायब तहसीलदार संभाजी शेलार यांनी त्यांच्या भाषणातून लोकशाहीमध्ये मतदानाच्या बाबतीत लोकांच्या मनात असलेला गैरसमज दूर केला.

याबाबतची सविस्तर माहिती देताना डॉ. कुणाल जाधव यांनी विविध मुद्दे स्पष्ट करताना प्रत्येक महाविद्यालयाने स्वतःचे निवडणूक साक्षरता केंद्र उघडून विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती द्यावी असे आवाहन केले आहे. ज्या ज्या विद्यार्थ्यांनी आजपर्यंत भारतीय नागरिक म्हणून स्वतःची नोंदणी केलेली नाही अशा सर्व विद्यार्थ्यांची नोंदणी करून घेण्याचं आवाहन केले आहे. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने आज विद्यार्थ्यांची नोंदणी केली जाणार आहे. त्याचबरोबर विविध तालुक्यांमध्ये हे कार्यक्रम राबवण्यात यावेत, असेदेखील त्यांनी आवाहन केले आहे.

कार्यक्रमाच्या प्रस्तावनापर भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी महाविद्यालयाच्या कामगिरीचा उल्लेख केला. तसेच भविष्यात आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या माध्यमातून अजून उल्लेखनीय कामगिरी करण्याचे आश्वासन दिले.ही कार्यशाळा यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे प्रमुख प्रो. डॉ. बी. एस. पाटील आणि त्यांच्या सहकार्यांनी खूप मेहनत घेतली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. हरिभाऊ खरात यांनी केले.

ही कार्यशाळा यशस्वीरित्या केल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे आणि महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी कौतुक केले.

## पनवेल, नवी मुंबई परिसरात एकाच दिवशी ७०० लग्नसोहळे

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

लग्नगाठी स्वर्गात बांधल्या जातात, असे म्हटले जाते. परंतु, नवी मुंबई शहरात सोमवारचा (दि. १८) दिवस लग्नाकरिता महत्त्वाचा असल्याचे दिसून आले. कारण पनवेलपासून ते अगदी दिघ्यापर्यंत शहरातील विविध मंगल कार्यालयांमध्ये ७०० पेक्षा अधिक लग्न सोहळे पार पडले आहेत. त्यामुळे केटरर्स, डेकोरेटर्स आणि मंगल कार्यालय व्यवस्थापनांची चांगलीच दमछाक झाली होती.

पंचांगानुसार यंदाच्या वर्षी एप्रिल आणि मे या हंगामात लग्नकार्याकरीता फारसे मुहूर्त नसल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे तुळशीच्या लग्नापासून सर्वत्र ठिकाणी लग्न समारंभ जोरदार सुरु झाली आहेत. नवी मुंबई शहरात महापालिकेनेही बहुउद्देशीय इमारतींमध्ये लग्न कार्याकरीता सभागृहे तयार केली आहेत. या व्यतिरिक्त अनेक खासगी व सामाजिक संस्थांचीही सभागृहे आहेत. ही सर्व सभागृह आजच्या लग्न सोहळ्यांमुळे हाऊसफुल्ल ठरली आहेत. शहरात जवळपास २५० पेक्षा जास्त लहान-मोठी मंगल कार्यालये आणि सभागृह असतील. तर ३५० पेक्षा जास्त कॅटर्स आहेत. त्यापेक्षा ५० टक्क्यांनी कमी डेकोरेटर्स आहेत. या सर्वांनाच आजच्या दिवशी अधिक असल्याने मोठी मागणी होती.



**गेल्या वर्षीसुद्धा १८ डिसेंबरला नवी मुंबईत एकही लग्नाचा हॉल उपलब्ध नव्हता. त्याचप्रमाणे आजही नवी मुंबईत जवळपास ७०० पेक्षा जास्त लग्न सोहळे झाले. एप्रिल व मे मध्ये फारसे मुहूर्त नसल्याने डिसेंबर, जानेवारीत लग्न सोहळ्यांचे प्रमाण अधिक आहे.**
**-कैलास मुद्रस, केटरर्स**

बऱ्याच ठिकाणी घोड्यावर वरात काढण्याची पद्धत असते. तर लग्नाच्या वरातील बँडबाजा हा असायलाच हवा. त्याशिवाय वरात निघत नाही, परंतु सोमवारच्या दिवशी एवढ्या मोठ्या प्रमाणात लग्न सोहळे झाल्यामुळे या सर्वच घटकांची धावपळ झाली होती.

# माणगावात ट्रॉमा केअर सेंटरची प्रतीक्षा

## वाढत्या अपघातांमुळे तातडीने कार्यवाहीची गरज

**माणगाव : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावरील माणगाव उपजिल्हा रुग्णालयाशेजारी ट्रॉमा केअर सेंटर मंजूर झाले आहे, मात्र गेले अनेक दिवस या ट्रॉमा केअर सेंटर उभारणीबाबत कोणतीही कार्यवाही अद्याप झालेली नाही.

मुंबई-गोवा महामार्ग व दिघी-पुणे राज्यमार्गावर अनेक वेळा विविध अपघाताच्या घटना घडल्या आहेत. या अपघातग्रस्तांवर तातडीने उपचार करण्यासाठी ट्रॉमा केअर सेंटरची नितांत गरज आहे. त्यामुळे याबाबत तातडीने कार्यवाही करण्याची मागणी होत आहे.

माणगाव तालुक्यासह अन्य तालुक्यातून नागरिक उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात मोठ्या संख्येने येतात. माणगाव ट्रॉमा केअर सेंटरला मंजुरी मिळाल्यामुळे माणगावची आरोग्य यंत्रणा अधिक बळकट होणार आहे, मात्र हे ट्रॉमा केअर सेंटर गेले अनेक दिवस कागदवरच राहिले असून हे सेंटर उभारणीसाठी शासन एक पाऊल पुढे कधी टाकणार? असा सवाल नागरिकांतून उपस्थित होत आहे.

माणगाव येथील उपजिल्हा रुग्णालयात सिटीस्कॅन मशीनची गरज आहे. ती आजही उपलब्ध नाही. माणगाव पंचायत समितीची स्वतंत्र इमारत गेली १६ वर्षांपूर्वी माणगाव प्रशासकीय भवन लगत भव्य स्वरुपात शासनाने बांधली आहे. त्याठिकाणी जि. प. च्या विविध विभागाचे काम सुरू आहे.

या इमारतीलगत माणगाव उपजिल्हा रुग्णालय असल्याने या ठिकाणी शासनांनी ट्रॉमा केअर सेंटर दोन वर्षांपूर्वी मंजूर केले असून ही जागा शासनांनी उपजिल्हा रुग्णालयाकडे वर्ग केली आहे. त्या जागेवर ट्रॉमा केअर सेंटर उभारले जाणार आहे.




## निवडक

### अग्रवाल विद्यामंदिराचे स्नेहसंमेलन



**नागोठणे :** येथील कोएसोच्या गु. रा. अग्रवाल विद्यामंदिर, कै. स. प्र. जैन उच्च माध्यमिक व कै. अ. जे. जैन प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन १९ ते २१ डिसेंबरदरम्यान होत आहे. मंगळवारी (दि. १९) रांगोळी प्रदर्शनाचे उद्घाटन सरपंच सुप्रिया महाडिक यांच्या हस्ते, चित्रकला व हस्तकला प्रदर्शनाचे उद्घाटन सेवानिवृत्त शिक्षक भास्कर सोलेगावकर यांच्या हस्ते तसेच विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन डॉ. सुनील पाटील यांच्या हस्ते झाले. चेअरमन नरेंद्र जैन, मुख्याध्यापिका राधिका ठाकूर, पोलीस निरीक्षक संदिप पोमन, विलास चौलकर, आनंदीबाई प्रधान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संदेश गुरव, सिराज पानसरे, तानाजी लाड, जयराम पवार, शांताराम गायकवाड, सहा. फौजदार प्रमोद कदम, मंगेश तेरडे, माजी सरपंच निलोफर पानसरे, माजी ग्रामपंचायत सदस्य प्रतिभा तेरडे, वर्षा देशपांडे, सुप्रिया परदेशी, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका राजश्री शेवाळे आदी उपस्थित होते.

### चंद्रकांत ताडकर सेवानिवृत्त



**नागोठणे :** ग्रामपंचायतीचे प्लंबर चंद्रकांत ताडकर हे आपल्या ३४ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर निवृत्त झाले. चंद्रकांत ताडकर यांच्या मुरावाडी येथील निवासस्थानी सोमवारी (दि.१८) श्री जोगेश्वरी माता देवस्थान विश्वस्त समितीचे सचिव दिलीप टके, उत्सव कमिटीचे माजी अध्यक्ष बाळासाहेब टके, अभियंता प्रसाद गवळी यांनी भेट देऊन ताडकर यांना शुभेच्छा दिल्या. नागोठणे ग्रामपंचायतीला जेव्हा माझी मदत लागेल तेव्हा मी मदतीसाठी नेहमीच तत्पर असेन, असे चंद्रकांत ताडकर यांनी सांगितले.

### नादुरुस्त विद्युत खांब बदलण्याची मागणी



**चौक :** ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील नादुरुस्त विद्युत खांब बदलण्याची मागणी भाजपचे चौक शहर अध्यक्ष प्रसाद देसाई यांनी केली आहे. ग्रुप ग्रामपंचायतीच्या चौक हद्दीत अनेक ठिकाणी विद्युत पुरवठा करणारे विद्युत खांब वाकले असून काही खांब खालच्या बाजूने सडले आहेत. अनेक ठिकाणी विद्युत वाहिनी लोंबकळत खाली आल्या आहेत. भाजपचे चौक शहराध्यक्ष प्रसाद देसाई यांनी विद्युत पुरवठा अधिकारी यांना निवेदन दिले आहे. आमदार महेश बालदी यांच्याकडे पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## मुरूड महाळुंगे व डाकेलीमधील कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश



**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील काकळघर ग्रामपंचायत हद्दीतील महाळुंगे व डाकेली येथील शेकाप कार्यकर्त्यांनी आमदार महेंद्र दळवी यांच्या कार्यप्रणालीवर विश्वास ठेवत शिवसेनेत प्रवेश केला.

अलिबागमधील आमदार महेंद्र दळवी यांचे निवासस्थानी पक्षप्रवेश झाला. या वेळी महाळुंगे बुद्रुक व डाकेली येथील शेकाप कार्यकर्ते, काकळघर माजी तंटामुक्त समिती अध्यक्ष मंगेश जोगत, काकळघर माजी उपसरपंच निवेदिता जोगत, संदेश जोगत, महेश जाधव, जोगेश वीर, सुभाष घडशी, राजेश घडशी आदींसह कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

या वेळी सि. एम. ठाकूर, उपजिल्हाप्रमुख भरत बेलोसे, तालुकाप्रमुख ऋषीकांत डोंगरीकर, उपतालुका प्रमुख भगिरथ पाटील, मनोज कमाने, तालुका संघटिका मंदा ठाकूर, प्रदीप धनावडे, विनोद पाडावे, काशिनाथ मोहिते, मधुकर पाटील, काकळघर सरपंच स्वस्तिक ठाकूर, माजी सरपंच सुरेश ठाकूर, गणेश ठाकूर, ग्रा.प.सदस्य निशांत दांडेकर, सदस्य सुदेश पाडावे आदी उपस्थिती होते.

आमदार महेंद्र दळवी यांनी, कार्यकर्त्यांचा मानसन्मान ठेवला जाईल, तसेच विकासकामांची निश्चित पुर्तता केली जाईल, असे आश्वासन दिले.



**चौक :** जुना मुंबई-पुणे महामार्गावर कलोते हद्दीत मंगळवारी एक झाड रस्त्यावरच पडले. त्यामुळे काही काळ वाहतूक कोंडी झाली होती. सुदैवाने जीवितहानी झाली नाही. खोपोली ते पनवेल या रस्त्यावर विशेष म्हणजे दांडफाटा ते खालापूरपर्यंत काही झाडे रस्त्याच्या बाजूला झुकली आहेत. त्यामुळे अशी झाडे त्वरित हटविण्याची मागणी होत आहे.

## अलिबागमध्ये नर्सिंग विद्यार्थिनींना सर्टिफिकेट वितरण

**अलिबाग : प्रतिनिधी**

युवा परिवर्तन याठिकाणी नुकताच नर्सिंग विद्यार्थिनींना सर्टिफिकेट वितरण कार्यक्रम पार पडला.

युवा परिवर्तन अलिबाग हे गेली १५ वर्षे अलिबागसह रायगड जिल्ह्यातील मुलामुलींना वेगवेगळे प्रशिक्षण देऊन त्यांना त्यांच्या पायावर उभे रहाण्यासाठी मदत करीत आहे. या प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमासाठी डॉ. ॲड. निहा अनिस राऊत, प्रिझम संस्थेच्या अध्यक्ष तपस्वी गोंधळी यांना आमंत्रित करण्यात आले होते. उपस्थित मान्यवरांनी मुलींना मार्गदर्शन केले. नंतर मुलींना त्यांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.

युवा परिवर्तनच्या सेंटर मॅनेजर अर्पणा पाटील यांनी मुलींना मार्गदर्शन केल्याबद्दल डॉ. ॲड. निहा राऊत व तपस्वी गोंधळी यांचे आभार मानले व मुलींना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



## रोहा शहरात खंडेरायाचा पालखी उत्सव

### पारंपरिक खालु बाजा वाद्यावर महिलांनी धरला फेर



**रोहे, धाटाव : प्रतिनिधी**

शहरातील धनगरआळी येथे चंपाषष्ठीनिमित्त खंडेरायाचा पालखी उत्सव सोमवारी (दि. १९) भाविकांनी मोठ्या उत्साहात साजरा केला.

श्री खंडेराय देवस्थान रोहे यांच्या विद्यमाने चंपाषष्ठी महोत्सव १३ ते १८ डिसेंबरदरम्यान साजरा करण्यात आला. धनगर आळी येथील खंडेराय मंदिर येथून सोमवारी सायंकाळी पारंपरिक खालु बाजा वाद्यावर पालखी काढण्यात आली. या वेळी खंडेराय देवस्थान रोहे विश्वस्त मंडळ अध्यक्ष संतोष खटावकर, उपाध्यक्ष हेमंत शेवाळे, सेक्रेटरी संजय कवितके, खजिनदार सचिन कुरकुंडे, सुनील भादेकर, संभाजी लाळगे, संतोष भादेकर, मल्हार भांड, किशोर पाडसे, दिलीप शेवाळे, प्रभाकर पाडसे, गोविंद कवितके आदींसह समाज बांधव, महिला मंडळ सहभागी झाले होते.

धनगर समाजबांधवांनी विविध वेशभूषा परिधान केली होती. शहरात ठिकठिकाणी रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या.

## टीएमसी कॉलेजमध्ये रोजगार मार्गदर्शन

**माणगाव : प्रतिनिधी**

येथील जे. बी. सावंत एज्युकेशन सोसायटीच्या टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेजमध्ये शुक्रवारी (दि. १५) रोजगार मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आले. पुणे येथील चार्टर्ड अकाऊंटंट राजेंद्र दंगी यांनी आत्मनिर्भर करिअर ऑपशन इन अकाउंट अँड टॅक्सेशन या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. राजेंद्र दंगी यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, बी. कॉम व एम. कॉम घेऊन १० ते १५ हजाराची नोकरी प्राप्त होते, परंतु जर पीएम हा सहा महिन्यांचा कोर्स केला तर लगेच आंतरराष्ट्रीय कंपनीमध्ये नोकरी मिळू शकते. जीएसटी टॅक्सेशन विक्रीकर टॅली व इतर कोर्सविषयी माहिती दिली. टीवाय बी. कॉमचे ४८ विद्यार्थी या कार्यक्रमास उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी राजेंद्र दंगी यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले व आपल्या मनोगतात विचार मांडले. कॉमर्स व अकाउंटन्सी विभागातर्फे हा सेमिनार आयोजित केला होता. प्रा. हर्षल जोशी व प्रा. अशोक मोरे यांनी सदर कार्यक्रम यशस्वीतेसाठी मदत केली प्रा. डॉ. माळी, अमित बाकाडे, सौ. मांडवकर, सौ. सायगावकर, प्रा. पवार व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## महिलांनी पुरोगामी विचार स्वीकारावे -संजना पाटील

**पाली : प्रतिनिधी**

महिलांनी आपला आत्मसन्मान जपावा. अनावश्यक रूढींमध्ये अडकून न राहता पुरोगामी विचार स्वीकारावे, असे विचार अभिनेत्री संजना पाटील यांनी बोर्लीपंचतन श्रीवर्धन येथील महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती रायगड यांच्या वतीने विधवा प्रथा व अनिष्ट रूढी निर्मूलन समाज सन्मान सोहळ्यात व्यक्त केले.

श्रीवर्धन येथे महिला सन्मानासाठी भरीव कार्य करणाऱ्या संस्था, समाजमंडळे व या पुरोगामी निर्णयांचा अवलंब करीत पुढाकार घेणाऱ्या व्यक्तींचा विशेष सन्मान करण्यात आला. या सन्मान सोहळ्यास प्रमुख उपस्थिती अभिनेत्री संजना पाटील, कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून समितीचे राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे होते. या वेळी मंचावर सरपंच ज्योती परकर, लिलाधर खोत, शरद पाटील, मानसी जाधव, रणजित मुरकर, सेजल पेडणेकर, प्रांजल पडवेकर, वसुधा खोत, विजय परब उपस्थित होते.

या वेळी खुजारे ग्रामपंचायत सरपंच निला पवार, महिला मंडळ अध्यक्ष संगीता काते दिवेआगर माळी समाज, श्रीवर्धन माळी समाज, वेळास भंडारी समाज, गणेशपेठ महिला मंडळ यांना सन्मानित करण्यात आले, तसेच विधवा प्रथा बंदीसाठी प्रबोधन व कृतीकरीता प्रातिनिधिक सत्कार ग्रामविकास अधिकारी खुजारे शंकर मयेकर, अजिता दवटे श्रीवर्धन, परकर गुरुजी परिवार बोर्ली यांचा सत्कार करण्यात आला.

या वेळी महा. अंनिस महिला विभाग राज्य कार्यवाह आरती नाईक, खुजारे पोलीस पाटील दिलीप खेडेकर, दिलीप भुसाने, सुहास मार्कंडे, सरपंच ज्योती परकर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रायगड कार्याध्यक्ष संदीप गायकवाड यांनी केले.

आभार सुप्रिया जेधे तसेच सुविधा गायकवाड यांनी मानले. सूत्रसंचालन महेंद्र ओव्हाळ व प्रियांका खेडेकर यांनी केले.




## फणसाड अभयारण्यात रानगव्यांचा संचार वाढला

**मुरूड : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील फणसाड अभयारण्यात रानगव्यांचा संचार वाढला आहे. याठिकाणी रानकुत्रे, शेकरूंची संख्याही वाढल्याची नोंद झाली आहे.

फणसाड अभयारण्याचे क्षेत्रात बिबट्या, सांबर, वानर, रानमांजर, भेकर, रानडुक्कर, साळींदर, पिसोरी, रानगवा आदी वन्यजीवांना संचार आढळला असून भीमाशंकर अभयारण्यात आढळणारी मोठी खार अर्थात शेकरूही इथे दिसून येतो.

अभयारण्य संरक्षित असल्याने दोन-तीन वर्षांत वन्यजीवांची संख्या वाढल्याने अभ्यासकांसह पशु-पक्षी निरीक्षकांसाठी पर्वणी ठरली आहे.



**फणसाड अभयारण्यात सद्यस्थितीत रानगव्यांची संख्या जवळपास १८ ते १९ आहे. अभयारण्यात ऑक्टोबरपासून निवासाकरीता डॉरमेटरीत टेंटची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. स्थानिक बचत गटातर्फे पर्यटकांच्या न्याहरी व भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. जंगलात फेरफटका मारण्यासाठी बैलगाडी सफरदेखील उपलब्ध आहे.**

**-तुषार काळभोर, वनपरिक्षेत्र अधिकारी, फणसाड**

## किनाऱ्याजवळ जेवण शिजविण्याचे प्रकार

### कारवाई करण्याची श्रीवर्धनमधील स्थानिकांची मागणी

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन समुद्रकिनारी दिवसाकाठी असंख्य पर्यटक येत असतात. यामध्ये अनेक शाळा व महाविद्यालयांच्या सहली, तर काही खासगी कंपन्यांच्या सहलीदेखील या ठिकाणी येत असतात, परंतु या सहली घेऊन येणारे आयोजक हॉटेलमध्ये जेवण न घेता आपल्याबरोबर आचारी, साहित्य, शेगडी, भांडी घेऊन समुद्रकिनारी जेवण शिजवण्याचे प्रकार करीत असल्याचे अनेक वेळा समोर आले आहे.



श्रीवर्धन समुद्रकिनारी अवधूत मंदिर आहे. या अवधूत मंदिराचा परिसर दशक्रिया, पिंडदान व उत्तरविधीसाठी गेल्या अनेक वर्षांपासून राखीव आहे. याबाबत नगर परिषदेला अनेक वेळा निदर्शनास आणूनही टाळाटाळ करण्यात येत आहे. हॉटेल व्यावसायिकांमध्येही नाराजी पसरली आहे. त्यामुळे श्रीवर्धन नगर परिषदेने या ठिकाणी जेवण बनवण्यास मनाई असल्याचे फलक लावावे, अशी मागणी स्थानिकांमधून केली जात आहे.

# आयपीएल लिलावात कोटीच्या कोटी उड्डाणे!




**दुबई : वृत्तसंस्था**

आयपीएलच्या आगामी हंगामासाठी खेळाडूंची लिलावप्रक्रिया मंगळवारी (दि.१९) झाली. या वेळी देशी-विदेशी मातब्बर खेळाडूंवर कोट्यवधी रुपयांची बोली लागली. यामध्ये काही भारतीय युवा खेळाडूही मालामाल झाले. यातील समीर रिझवीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

लिलावासाठी ३३३ खेळाडूंची निवड करण्यात आली होती, तर सर्व संघांकडे फक्त ७७ जागा शिल्लक होत्या. मिचेल स्टार्क आणि पॅट कमिन्स या तेज ऑस्ट्रेलियन जोडगोळीवर लिलावात अनुक्रमे २४.७५ कोटी आणि २०.५० कोटी रुपयांच्या विक्रमी बोली लागल्या. याशिवाय भारताचा हर्षल पटेल ११.७५ कोटी रुपये (पंजाब किंग्स), वेस्ट इंडिजचे अल्जारी जोसेफ ११.५० कोटी (आरसीबी) व रोवमैन पॉवेल ७.४० कोटी रुपये (राजस्थान रॉयल्स), ऑस्ट्रेलियाचा ट्रेविस हेड ६.८० कोटी रुपये (सनराइजर्स हैदराबाद), दक्षिण आफ्रिकेचा गेराल्ड कोएत्जी पाच कोटी रुपये (मुंबई इंडियन्स), भारताचे शिवम मावी ६.४० कोटी रुपये (लखनऊ सुपर जायंट्स) व उमेश यादव ५.८० कोटी रुपये (गुजरात टायटन्स) यांनाही चांगली बोली लागली.

दुसरीकडे वनडे क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत सर्वांचे लक्ष वेधून घेणारा न्यूझीलंडचा डॅशिंग सलामीवीर रचिन रवींद्रला अपेक्षित किंमत मिळाली नाही. रचिनला चेन्नई सुपर किंग्जने अवघ्या १.८० कोटी रुपयात संघात सामावून घेतले, तर युवा समीर रिझवीसाठी ८.४० कोटी रुपये मोजले. त्याच्यासाठी गुजरात टायटन्स आणि चेन्नई यांच्यात चुरस रंगली होती. रिझवीची बेस प्राइज ही २० लाख होती, पण या दोन्ही संघांनी सात कोटी रुपयांपर्यंत त्याच्यावर बोली लावली. त्यानंतर गुजरातचा संघ या बोलीतून बाहेर पडला. त्यानंतर हा खेळाडू आता चेन्नईला भेटेल, असे वाटत होते, पण त्यानंतर दिल्लीचा संघ बोली लावण्यासाठी उत्सुक झाला होता. अखेर चेन्नईने सर्वाधिक किंमत मोजत त्याला आपल्या संघात दाखल केले.

समीर रिझवी हा उत्तर प्रदेशचा खेळाडू आहे. या २० वर्षीय खेळाडूने युपी टी-२० लीगमध्ये कानपूर सुपरस्टार्ससाठी सर्वाधिक षटकार ठोकले आणि दोन धडाकेबाज शतके झळकावली. त्याचबरोबर नऊ डावांत ४५५ धावा पूर्ण केल्या. त्यामुळे त्याच्या नावाची जोरदार चर्चा सुरू होती. चेन्नई संघाने त्याला आपल्या ताफ्यात स्थान देऊन स्मार्ट खेळी केली आहे.

चेन्नईच्या संघाने या वेळी शार्दुल ठाकूरवर आपला विश्वास कायम ठेवला आणि त्याला आपल्या संघात स्थान दिले. त्याचबरोबर चेन्नईने रचिन रवींद्रसारख्या अष्टपैलू खेळाडूला आपल्या संघात दाखल करून घेतले. रचिनने वनडे वर्ल्डकपमध्ये धडाकेबाज कामगिरी केली होती. चेन्नईचा संघ फक्त एवढ्यावर थांबला नाही. त्यांनी डॅरिल मिचलेलाही आपल्या ताफ्यात दाखल करून घेतले. त्यामुळे चेन्नईचा संघ आता पुढे कोणत्या खेळाडूला आपल्या संघात स्थान देणार याची जोरदार चर्चा सुरू होती. चेन्नईने त्यालाही आपल्या ताफ्यात दाखल करून घेतले आहे.

## श्री गणेशनगर संघ डब्ल्यूपीएलचा विजेता



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

वासंबे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच व विद्यमान सदस्य संदीप मुंढे यांनी आयोजित केलेल्या वासांबे प्रीमियर लीग (डब्ल्यूपीएल)चे विजेतेपद श्री गणेश इलेव्हन गणेशनगर संघाने पटकाविले. यश युवराज इलेव्हन चांभार्ली संघ उपविजेता ठरला.

डब्ल्यूपीएलच्या दुसऱ्या पर्वाच्या पहिल्याच दिवशी खासदार सुनील तटकरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्याचप्रमाणे स्थानिक नेते, राजकीय व सामाजिक कार्यकर्ते, वारकरी मंडळी आदींनी उपस्थिती दर्शवून आयोजनाचे कौतुक केले.

या स्पर्धेत एकूण १२ संघांनी सहभाग नोंदविला होता. लकी ड्रॉच्या साहाय्याने फायनलला पोहचलेला यश युवराज इलेव्हन चांभार्ली संघ आणि संघर्ष करीत आलेला श्री गणेश इलेव्हन गणेशनगर संघ यांच्यात अंतिम सामना रंगला. प्रथम फलंदाजी करीत गणेशनगर संघाने रजत मुंढे याच्या तुफान फटकेबाजीच्या जोरावर चार षटकांमध्ये चार गडी गमावत ६१ धावा केल्या. प्रत्युत्तरात चांभार्ली संघ चार षटकांमध्ये दोन गडी गमावून ५२ धावाच करू शकला. १५ चेंडूंत ४७ धावा ठोकणारा रजत सामनावीर ठरला.

विजेत्या संघाला एक लाख ११ हजार १११ रुपये व भव्य चषक, उपविजेत्या चांभार्ली संघाला ५५ हजार १११ रुपये व चषक आणि तृतीय क्रमांकप्राप्त अनन्या इंटरप्राईजेस तळेगाववाडी संघाला ३० हजार १११ रुपये व चषक देण्यात आला.

मालिकावीर रजत मुंढे (गणेशनगर), उत्कृष्ट फलंदाज योगेश जांभळे (चांभार्ली), उत्कृष्ट गोलंदाज जितू जांभळे (गणेशनगर) आणि उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून शार्दुल ठाकूर (तळेगाववाडी) यांची निवड करून त्यांना बक्षिसाने गौरविण्यात आले.

## जासई विद्यालयात क्रीडा महोत्सव उत्साहात



**नवी मुंबई : बातमीदार**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा. पाटील ज्युनिअर कॉलेज येथे वार्षिक क्रीडा महोत्सव मोठ्या उत्साहात झाला. त्यास प्रतिसाद लाभला.

शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष, भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री व कामगार नेते सुरेश पाटील यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. त्यांनी या क्रीडा महोत्सवात जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन शिस्तीचे व खिळाडूवृत्तीचे प्रदर्शन करून खेळाचा आनंद घेण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या वेळी विशेष उपस्थिती म्हणून नवी मुंबई पुनर्वसन सामाजिक संस्थेचे सहसचिव व दि. बा. पाटीलसाहेब चळवळ स्पर्धेचे प्रमुख संयोजक शैलेश घाग यांनीही विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

उद्घाटन समारंभास अरुण घाग, नरेश घरत, जयश्री घरत, रयत सेवक संघाचे महाराष्ट्र समनवयक नूरा शेख आदी उपस्थित होते. या महोत्सवात कबड्डी, खो-खो,धावणे, लंगडी इत्यादी मैदानी खेळांच्या स्पर्धा रंगल्या.

## 'झुंझार'च्या क्रिकेट स्पर्धेत कोंढाळकर क्रिकेट अकॅडमी संघ विजयी

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील पोयनाड येथे झुंझार युवक मंडळ आयोजित कै.मिलिंद रवींद्र चवरकर स्मृतीचषक एकदिवसीय ४० षटकांच्या लेदरबॉल क्रिकेट स्पर्धेतील साखळी फेरीच्या सामन्यात कोंढाळकर क्रिकेट अकॅडमी लोधिवली संघाने वीर स्पोर्ट्स क्रिकेट अकॅडमी संघावर विजय मिळवला. लोधिली संघाकडून सुयश पारंगे याने अष्टपैलू कामगिरी केली.

### सुयश पारंगेची अष्टपैलू कामगिरी



नाणेफेकीचा कौल जिंकून प्रथम फलंदाजीला उतरलेल्या कोंढाळकर क्रिकेट अकॅडमीने ४० षटकांच्या समाप्तीनंतर चार गडी बाद २१० धावा फलकावर नोंदवल्या. सलामीवीर सुयश पारंगे याने ३३ धावा केल्या, तर मधल्या फळीत स्वरा खेडेकर हिने संयमी फलंदाजी करीत ८२ चेंडूंचा सामना करीत १० चौकारांच्या साहायाने सर्वाधिक ८६ धावा केल्या. स्वराने स्पर्धेतील लागोपाठ दुसरे अर्धशतक ठोकले आहे. याशिवाय ओम सांगले याने ३५ धावांचे योगदान दिले. वीर स्पोर्ट्सकडून मिहीर जंझोत व समर्थ घोलप यांनी प्रत्येकी एक फलंदाजाला बाद केले.

प्रत्युत्तरात वीर स्पोर्ट्स संघाचा डाव ३२ षटकांमध्ये ८६ धावांत संपुष्टात आला. यामध्ये वंश कडू याने १४, तर विवान मांढरेने ११ धावा केल्या. कोंढाळकर क्रिकेट अकॅडमीकडून सुयश पारंगे याने चार, तर रिषभ ठाकूर व अथर्व माम्हूणकर यांनी प्रत्येकी दोन फलंदाज बाद केले. अशा प्रकारे लोधिवली संघाने सामना तब्बल १२४ धावांनी जिंकला.

अष्टपैलू खेळाडू सुयश पारंगे याला सामनावीर, वंश कडू स्टार प्रतिस्पर्धी खेळाडू, स्वरा खेडेकर, विवान मांडोरे, ओम सांगले इमॅर्जिंग प्लेअर, सोहम अरसुरे आणि समर्थ घोलप यांना उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून झुंझार मंडळाचे सचिव किशोर तावडे, महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे निवड समितीचे सदस्य राजेंद्र कोंढाळकर, प्रवीण कडू, अशोक पारंगे, मदन घरत, मोजेस नवगावकर, संकेश ढोले, आदेश नाईक यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.



## विहिघर येथे भूपेंद्रशेठ पाटील चषक क्रिकेट स्पर्धा

■ भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील विहिघर येथे दोस्ती ग्रुप आणि दोस्ती स्पोर्ट्स यांच्या वतीने भूपेंद्रशेठ पाटील चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्घाटन भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते बुधवारी (दि.१९) झाले.

साई मैदानावर खेळविण्यात येत असलेल्या या स्पर्धेत ३२ संघ सहभागी झाले असून स्पर्धा २४ डिसेंबरपर्यंत रंगणार आहे. विजेत्या पहिल्या पाच संघांना रोख रक्कम व चषक देण्यात येणार आहे.

उद्घाटन समारंभास भाजप तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष अमित जाधव, माजी पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, वाजे सरपंच राजेश भोईर, उपसरपंच रेवण पाटील, आयोजक सुनील पाटील, चिपळे सदस्य धनंजय पाटील, अनंता वाघ, राजेश पाटील यांच्यासह इतर मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते व क्रीडाप्रेमी नागरिक उपस्थित होते. या वेळी अरुणशेठ भगत यांनी मैदानात जाऊन फटकेबाजी करीत फलंदाजीचा आनंद लुटला.

## पराभवानंतर पाकिस्तान संघाला आणखी एक धक्का

### स्लो ओव्हर रेटबद्दल दंड

**दुबई : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पहिल्या कसोटीत पाकिस्तानी संघाचा ३६० धावांनी मोठा पराभव झाला. अशातच आता पाकिस्तानला आणखी एक मोठा दणका बसला आहे. पहिल्या कसोटीत स्लो ओव्हर रेट राखल्याबद्दल पाकिस्तानला ऑस्ट्रेलियाविरुद्ध दंड ठोठावण्यात आला आहे.

पाहुण्या संघाला मॅच फीच्या १०% दंड ठोठावण्यात आला आणि त्यांच्या एकूण आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप पॉईंट्समधून दोन गुण वजा करण्यात आले. पाकिस्तान जागतिक कसोटी चॅम्पियनशिप क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर घसरला होता. या पेनल्टीमुळे त्यांचे टक्केवारी गुण ६६.६७ वरून कमी होऊन ६१.११वर घसरले.

आयसीसी आचारसंहितेचा कलम २.२२ षटकांच्या गतीशी संबंधित आहे. यानुसार खेळाडूंना त्यांच्या संघाने दिलेल्या वेळेत गोलंदाजी करता न आल्याने प्रत्येक षटकासाठी त्यांच्या मॅच फीच्या पाच टक्के दंड आकारला जातो. या व्यतिरिक्त वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप खेळण्याच्या अटींच्या कलम १६.११.२ नुसार संघाला उशीर झालेल्या प्रत्येक षटकासाठी एक डिमेरिट पॉइंट दिला जातो. म्हणजेच तितके गुण वजा होतात. परिणामी पाकिस्तानच्या एकूण गुणांमधून दोन जागतिक कसोटी चॅम्पियनशिप गुण वजा करण्यात आले आहेत.

महिला इनडोअर क्रिकेट निवड चाचणी स्पर्धा

## के.व्ही. क्लबचा एम.पी. शहा क्लबवर विजय



**मुंबई : प्रतिनिधी**

महाइनडोअर क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेने महामुंबई इनडोअर क्रिकेट स्पोर्ट्स असोसिएशनतर्फे महिला इनडोअर क्रिकेट निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन मुंबईतील दादर येथील अर्बन स्पोर्ट्स टर्फ येथे करण्यात आले होते. या स्पर्धेला महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या स्पर्धेत अंतिम सामन्यात के.व्ही. क्लबने एम.पी. शहा क्लबवर विजय साजरा करीत स्पर्धेचे जेतेपद मिळवले.

अंतिम सामन्यात के.व्ही. क्लबने एम.पी. शहा क्लबवर ५० धावांनी विजय साजरा केला. या सामन्यात के.व्ही. क्लबने प्रथम फलंदाजी करताना १६ षटकांत ११९ धावा केल्या होत्या. एम.पी. शहा क्लबला १६ षटकांत ६९ धावाच करता आल्या. त्यांच्याकडून पी. अयेराम व मेघा पहिल्या चार षटकांत फक्त पाच धावाच करू शकल्या. दुसऱ्या चार षटकांत पिंकी (१६ धावा) व तन्वीने (१४ धावा) यांनी अवांतर धावांसह ३१ धावा फलकावर लावल्या. त्यानंतर आलेल्या लक्ष्मी (नऊ धावा) व उर्वशीने (१६ धावा) यांनी अवांतर धावांसह ३१ धावा फलकावर लावल्या व शेवटच्या जोडीतील रिया व कोमलने शेवटच्या चार षटकांत सहा धावा केल्या.

तत्पूर्वी पहिल्या चार षटकांत के.व्ही. क्लबच्या समृद्धीने (१४ धावा), सुनंदाने (२५ धावा) धावा चोपत अवांतर धावांसह धावफलकावर ४२ धावा लावत संघाला एक आश्वासक सुरवात करून दिली. त्यानंतर आलेल्या के. आर्या व उषाने पुढच्या चार षटकांत निराशजनक कामगिरी करताना वजा २१ धावा झाल्याने संघाला २१ धावांचे नुकसान झाले. त्यनंतर आलेल्या एस. आर्याने (१९ धावा) व सईने चार षटकांत २७ धावांची भर घातलीम तर शेवटच्या चौथ्या जोडीने आर. शेजलने (३८ धावा, दोन षटकार, एक चौकार) व बी. परेराने (३३ धावा, तीन षटकार, एक चौकार) जोरदार खेळी करताना अवांतर धावांसह शेवटच्या चार षटकात ७१ धावांची भर घातल्याने संघाला धावफलकावर ११९ धावा लावता आल्या.

## आयपीएलमध्ये फलंदाजांचे टेन्शन वाढणार

### गोलंदाजाला प्रत्येक षटकात दोन बाऊन्सर टाकण्याची परवानगी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएल पुढील वर्षी मार्चमध्ये खेळली जाणार आहे. नवीन हंगामात आणखी काही नवे बदल पहायला मिळू शकतात. १७व्या हंगामासाठी गोलंदाजांशी संबंधित एक नवीन नियम लागू करण्यात आला आहे, ज्यामुळे फलंदाजांचे टेन्शन वाढणार आहे.



आयपीएलमध्ये आता वेगवान गोलंदाजांना प्रत्येक षटकात दोन बाऊन्सर टाकण्याची परवानगी असेल. सामन्याची उत्कंठा वाढवण्यासाठी हा नवा नियम लागू करण्यात आला आहे. इम्पॅक्ट प्लेयर नियमाच्या अंमलबजावणीनंतर हा बदल झाला आहे. इम्पॅक्ट प्लेअर नियमांतर्गत एका संघाकडे नाणेफेकीच्या वेळी प्लेइंग इलेव्हनव्यतिरिक्त चार खेळाडूंची यादी असते. संघ चारपैकी कोणत्याही एका खेळाडूचा इम्पॅक्ट प्लेअर म्हणून वापर करू शकतो.

आयपीएल मार्च २२ ते मे अखेरपर्यंत खेळली जाण्याची शक्यता आहे. आयपीएलचे वेळापत्रक अद्याप जाहीर झालेले नाही. वास्तविक, भारतात पुढील वर्षी लोकसभेची निवडणूक होणार आहेत आणि अशा परिस्थितीत निवडणूक आयोगाने तारखा जाहीर केल्यानंतरच वेळापत्रक जाहीर केले जाईल.

## मिचेल स्टार्कच्या पत्नीला डब्ल्यूपीएलमध्ये मोठी रक्कम

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाच्या मिशेल स्टार्कसाठी कोलकाता नाईट रायडर्सने यंदाच्या लिलावात विक्रमी अशी २४.७५ कोटी रुपयांची बोली लावली. स्टार्कला मिळालेल्या रक्कमेत त्याची पत्नी लिसा हिचीसुद्धा वुमन्स प्रीमियर लीगमधील कमाई जोडल्यास आणि त्यातूनही कर वजा केल्यास स्टार्क कुटुंबाच्या घरी एकत्रित अत्यंत मोठी रक्कम पोहचणार आहे.

डब्ल्यूपीएलसाठी झालेल्या लिलावात युपी वॉरिवर्झ संघाने ७० लाख रुपयांत लिसा हिलीला ताफ्यात समाविष्ट केले होते. ऑस्ट्रेलियाची विकेटकीपर बॅट्समन असणारी लिसा दोन वनडे वर्ल्डकपविजेत्या आणि सहा ट्वेन्टी-२० वर्ल्डकपविजेत्या संघाचा भाग होती. लिसाने सात कसोटी, ९७ वनडे आणि १४४ टी २० सामन्यांमध्ये ऑस्ट्रेलियाचे प्रतिनिधित्व केले आहे. ऑस्ट्रेलियात होणाऱ्या महिलांच्या बिग बॅश ट्वेन्टी-२० स्पर्धेत लिसा सिडनी सिक्सर्स संघाकडून खेळते.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com